## प्रकरण पहिले

# कादंबरी वाङ्मय उदय आणि विकास

# प्रकरण पहिले

# कादंबरी वाङ्मय उदय आणि विकास

## ❖ प्रास्ताविक: -

'कादंबरी' हा जागतिक पातळीवर लोकप्रियता प्राप्त झालेला असा वाङ्मय प्रकार आहे. 'कादंबरी' हा आधुनिक काळात उदयाला आलेला प्रकार मानला असला तरी त्याची पाळेमुळे प्राचीन वाङ्मयात सापडतात. कथा सांगणे किंवा गोष्टी सांगणे, ऐकणे ही मानवाची पुरातन अशी प्रवृत्ती आहे. कथा - कादंबरीचे आकर्षण मानवाला प्राचीन काळापासून आहे. संस्कृत, प्राकृत या भाषांमध्ये कथा आख्याने विपुल प्रमाणात सापडतात. 'कादंबरी' या संस्कृत शब्दाचा अर्थ 'सरस्वती कोकिळा' असा आहे. 'कथेचे दीर्घरूप म्हणजे कादंबरी' असेही म्हणता येईल. कादंबरी या वाङ्मयाचा विकास मात्र पाश्चात्य देशामध्ये झाला. अठराव्या शतकात तिचे रूप उत्क्रांत झाले आणि एकोणिसाव्या शतकात एक प्रधान साहित्यप्रकार म्हणून वाङ्मयात मान्यता पावला. मात्र मराठी वाङ्मयात कादंबरी खूपच उशिरा अवतरली.

पाश्चात्य कादंबरीच्या धर्तीवर मराठी कादंबरीने हळूहळू मूळ धरले. कादंबरीच्या विकासाच्या दृष्टीने तत्कालीन काळातील वातावरण अनुकूल - प्रतिकूल अशा संमिश्र स्वरूपाचे होते. तरीही कादंबरीरूपी बीजाच्या मूळाने चांगलाच जोम धरून मोठया वृक्षात रूपांतर झाले असेच म्हणावे लागेल. जसजसे समाजपरिवर्तन होत गेले तसा काळही बदलू लागला. माणसांच्या विचारांमध्ये परिवर्तन होत गेले. या साऱ्यांचा परिणाम सर्व साहित्य प्रकारांवर झाला. तो कादंबरीवरही झाला. जसा काळ बदलला तशी कादंबरीही बदलत गेली. काळपरिवर्तनाबरोबरच कादंबरीचे रूपही बदलत गेले. नवनवीन वाटा चोखाळल्या. कादंबरी वाङ्मयाचा जसजसा विकास होत गेला तसतसे नवे प्रवाह निर्माण होत गेले. पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, चरित्रात्मक, राजकीय त्याचबरोबर दलित आणि ग्रामीण हे प्रमुख साहित्यप्रवाहही निर्माण झाले. आजची कादंबरी विविध प्रवाहांनी समृध्द अशी झाली आहे. मराठी कादंबरी वाङ्मयाचे दालन एक समृध्द दालन म्हणून नावारूपास आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात कादंबरी वाङ्मयाच्या इतिहासाचा विवेचक अभ्यास कादंबरीची पूर्वपीठिका स्वरूप, व्याख्या, ग्रामीण कादंबरीचा उदय आणि वैशिष्टये या मुद्यांच्या आधारे करावयाचा आहे.

❖ 'कादंबरी' या साहित्य प्रकाराची पूर्वपीठिका: -

प्राचीन काळापासूनच मानवाला कथेचे आकर्षण आहे. कथा - कवितातून मानवी जीवनाची काही अंगे प्रकट होत गेली. कथा - कविता हे माध्यम मानवाला अपुरे वाटू लागले आणि यातूनच दीर्घ अशा कथानकाला मानवाने जन्म दिला. या कथानकाला 'कादंबरी' हे नाव दिले गेले. 'कादंबरी' म्हणून लोकप्रिय असलेला हा वाङ्मय प्रकार आधुनिक काळातील मानला जात असला तरी त्याचे बीज हे प्राचीन काळात रूजले होते. "कादंबरीचे मूळ स्वरूप आणि उगम हा प्राचीन कथा - कथनपरंपरेकडे घेऊन जातो."[१] असे भालचंद्र नेमाडे यांनी नमूद केले आहे. मराठी साहित्यातील पहिला गद्यपद्यात्मक ग्रंथ म्हणून ओळखला जाणारा 'लीळाचरित्र' हा ग्रंथ म्हणजे कादंबरीचेच मूळ बीज आहे. या ग्रंथात चक्रधरांचा जीवनपटच कथारूपाने गुंफून तीन भागात वर्णन केला आहे.

अर्वाचीन काळाचा विचार केल्यास कादंबरीचा उगम हा अठराव्या शतकात युरोपमध्ये झाल्याचे दिसते. 'जपानमध्ये कादंबरी बाराव्या शतकात आणि चीनमध्ये पंधराव्या शतकात अस्तित्वात आली.'[२] हे स्पिअरमनने केलेले विधान दुर्गा भागवत यांना मान्य नाही. त्यांनी स्पिअरमनच्या या विधानाचे खंडन करून पुढे असे म्हटले आहे की, " 'डायना स्पिअरमन' ला बाणाच्या कादंबरीची माहिती असती तर या विधानात थोडा बदल केला असता. बाणाची कादंबरी इसवी सनाच्या सातव्या शतकात लिहिली असल्याने कादंबरी प्रथम भारतात निर्माण झाली."[३] या त्यांच्या विधानावरून कादंबरीचा जन्म भारतातच झाला आहे असे दुर्गा भागवत यांना म्हणावयाचे होते असे स्पष्ट होते.

कादंबरीचे बीज हे प्राचीन वा देशोदेशीच्या लेखनात सापडत असले तरी एक वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीने धारण केलेला रूपबंध ही बाब अर्वाचीन आहे. या संदर्भात मीनाक्षी मुखर्जीचे मत विचारार्थ आहे. त्याच्या मते, "एकोणिसाव्या शतकातील युरोपमध्ये कादंबरी या वाङ्मय प्रकाराने आपले स्पष्ट स्वतंत्र व्यक्तिमत्त्व धारण केले तेव्हा त्याचा घाट हा आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या महाकाव्य, अद्भूतकथा व वीरकथा (Saga) या कथनप्रकारच्या संरचनापेक्षा निश्चितपणे भिन्न होता."[४] एकूणच अर्वाचीन कादंबरी युरोपात उगम पावली हे नाकारता येणार नाही. नाटक किंवा कविता या वाङ्मयप्रकारांप्रमाणे 'कादंबरी' या वाङ्मयाला शतकानुशतकाची दीर्घ अशी परंपरा नाही. थोडक्यात 'कथेचे दीर्घरूप म्हणजे कादंबरी' अशी संकल्पना रूढ झाली.

'कादंबरी' या वाङ्मयाचा विकास पाश्चात्य देशामध्ये झाला. १८ व्या

शतकात तिचे रूप अवतरू लागले. १९ व्या शतकाच्या प्रारंभी एक वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरी वाङ्मयाचा विकास झाला. मराठी साहित्यविश्वात कादंबरीचे अस्तित्व एकोणिसाव्या शतकात जाणवू लागले होते. हे जरी खरे असले तरी 'भालचंद्र नेमाडे' यांना हा रचनाप्रकार नवीन वाटत नाही. त्यांच्या मते, "कादंबरी हा साहित्यप्रकार जरी इंग्रजीवरून संयोगाने आला असला तरी एक रचनाप्रकार म्हणून तो हिंदुस्थानात तरी नवा नाही"[५] पुढे ते असेही म्हणतात की, "लीळाचरित्र, स्मृतिस्थळ, बखरी, महिपती कृत चरित्र हे रचना प्रकार कादंबरीशी जुळणारेच आहेत. परंतु आपल्या कादंबरीकारांनी अनुकरणाने रूढ केली तीच कादंबरी असा अंधविचार पुढे येऊन तीन पिढया त्यातच गेल्या"[६]

इंग्रजीतील 'NOVEL' (नॉव्हेल) या संज्ञेवरून मराठीत 'कादंबरी' अशी संज्ञा रूढ झाली. समाजपरिवर्तन होत गेले काळ बदलला तसे तिचे स्वरूप बदलत गेले आणि तिचे तंत्रही बदलते आहे. मराठी समीक्षेत 'कादंबरी' ची संकल्पना फार उशिरा अस्तित्वात आली हे मान्य करावे लागेल. 'कादंबरी' या नावाने मराठी समीक्षेत या वाङ्मयप्रकाराला ओळखले जाऊ लागले. कादंबरी जीवनप्रवाहाबरोबर बदलणारा एक साहित्यप्रकार म्हणून उदयास आला. कादंबरी ही विविधांगी आहे. प्राचीन, अर्वाचीन, पाश्चात्य या साहित्याच्या अनुरूपातूनच कादंबरी प्रकट होत गेली. या संदर्भात रवींद्र ठाकूरांचे मत विचारार्थ आहे. त्यांच्या मते, "अव्वल इंग्रजीतील महाराष्ट्रीय लेखकांनी प्राचीन मराठीतील कथात्मक साहित्यपरंपरेकडे दुर्लक्ष करून इंग्रजी साहित्य प्रकाराचे अनुकरण सुरू केले. मराठी कादंबरीला दिले गेलेले 'कादंबरी' हे सामान्यनाम संस्कृत परंपरा निर्देशिते परंतु तो संबंध बराचसा नाममात्रच म्हणावा लागेल. याचा अर्थ मराठी कादंबरीने संस्कृतचे ऋण स्वीकारलेले नाही असा मात्र नाही."[७] मराठी साहित्य समालोचक 'वि. सी. सरवटे' 'मराठी कथा कादंबऱ्याच्या विकासाचे सारे श्रेय इंग्रजी व फार्सी वाङ्मय भांडारास देतात' मात्र कुसुमावती देशपांडे यांना तसे वाटत नाही. त्यांच्या मते, "राजकीय घडामोडीमुळे सामाजिक जीवनाची घडी इतकी विस्कटली नसती आणि मराठीशाहीतील गद्यरचनेच्या प्रकाराची आठवण बुजली नसती व त्यांच्या अवशेषाची जास्त जपणूक झाली असती तर या फार्सी किंवा इंग्रजी साहित्याशिवायही मराठी कादंबरीची उत्क्रांती झाल्याशिवाय राहिली नसती."[८] अशी आशा कुसुमावती देशपांडे व्यक्त करून पुढे त्या असेही म्हणतात, "माध्यमातील भेदाची बाजू वगळता आधुनिक कादंबरी आणि कीर्तन, पोवाडे, लावण्या यांच्यातील जीवनदर्शनाची कार्यपध्दती समानच होती."[९] कादंबरी नेमके कशाला म्हणावे याचा विचार मराठी समीक्षेत फारच कमी समीक्षकांनी केलेला दिसून येतो.

हरिभाऊ आपटे, इतिहासाचार्य राजवाडे, श्री. व्यं. केतकर अशा काही मोजक्याच कादंबरीकारांची कादंबरीची कल्पना प्रगल्भ अशा स्वरूपाची होती. परंतु त्यांनी तिच्याविषयी अथवा तिच्या विचारांची सुस्पष्ट अशी मांडणी केली नाही. नंतरच्या काळात दुर्गा भागवत, कुसुमावती देशपांडे, नरहर कुरूंदकर यांनी समीक्षा करून कादंबरी वाङ्मयाचा विचार केलेला दिसून येतो.

अलीकडच्या काळात भालचंद्र नेमाडे, वा. ल. कुलकर्णी, रा. ग. जाधव, उषा हस्तक यांच्या लेखनामुळे कादंबरी वाङ्मयाचा विचार अधिक विस्तृतपणे मराठी समीक्षेत होऊ लागला आहे. उषा हस्तक यांनी मराठी कादंबरीच्या समीक्षेविषयी एक प्रकारची खंत व्यक्त केलेली आहे. त्यांच्या मते, "कादंबरी लेखनाला प्रवृत्त होण्यापूर्वी कादंबरीकारांनी आणि टीकेचे घाव घालण्यापूर्वी टीकाकारांनी कादंबरीच्या कथात्मक रूपाची अंगभूत वैशिष्टये शोधण्याची नितांत गरज होती. पण एक हरिभाऊ सोडले तर या दिशेने आणखी कोणाची जाणती पावले पडलेली आहेत, असे आढळत नाही. अन्य कथात्मक वाङ्मयप्रकाराहून कादंबरीचे वेगळेपण काय ? हे समजावून न घेतल्यामुळे 'कादंबरी' असे नेमके कोणत्या लेखनाला म्हणावे याविषयी निश्चित अशा कल्पना आकाराला येऊ शकल्या नाहीत तिच्या रचनेची मूलतत्त्वे गवसू शकली नाहीत."[१०]

कादंबरी सभोवतालच्या जीवनातील घटना - घटक घेऊन आकारास येत असते. कादंबरी जीवनाचा शोध तर घेत असतेच पण त्याचबरोबर आत्म्याचाही शोध घेत असते. विविधांगी जीवनचित्रण कादंबरीत अगदी सहजपणे उमटते. कादंबरी ही काही घटना तसेच पात्रांच्या सहाय्याने जीवनाचा व मानवी मनाचा शोध घेत असते. कादंबरीचा निर्मितीकार जीवनाचे भावलेले रूप, अनुभव व्यक्त करीत असतो. कुसुमावती देशपांडे यांच्या मते, "पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरीची वृत्ती, जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे तत्त्वदर्शित्वाचा किंवा अद्‌भूताचा मार्ग धरून मूलत: मानवी प्रश्नाचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन जीवनविषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री ही वृत्ती हा दृष्टिकोन हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एक विस्तृत आकर्षक कथानकाच्याद्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पध्दती."[११] 'कादंबरी' ही विशिष्ट कालावधीत घडणाऱ्या घटनांची मालिका उलगडत जाते. कादंबरीच्या स्वरूपाविषयी मानवेंद्रनाथ बंडोपाध्याय लिहितात, "It is both biography and chronicle biography. Because, it aims at depicting the

life of one or more individuals and chronicle. Because, these individuals are the creation of particular age and society."[१२]

'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार एखाद्या महाकाव्यासारखा आहे. एखाद्या देशातील समाजजीवन, तेथील समूहजीवन, लोकांची सुख - दु:खे, रूढी, परंपरा, संस्कृती, आशा - आकांक्षा या साऱ्यांचे चित्रण कादंबरीत येत असते. मनोरंजनाबरोबरच समाजाला बोधही केला जातो. 'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार असा आहे की, माणसाच्या (वाचकाच्या) मनाला भुरळ घालतो. मानवी मनातील आंदोलने, मनोव्यापार, गुंतागुंत या साऱ्या गोष्टींना कादंबरीत महत्त्वाचे स्थान असते. लेखक समाजजीवनाचे वर्णन कादंबरीत करीत असतो. म्हणूनच सर्व प्रकारामध्ये कादंबरी हा वाङ्मय प्रकार सर्वात श्रेष्ठ ठरतो. सामाजिक वास्तव कादंबरीत येत असते. सामाजिक जीवन आशयरूपाने मांडले जाते. व्यक्ती हा समाजाचा घटक असल्याने व्यक्ती आणि समाज यांचा परस्परांशी संबंध असतो. व्यक्ती ही समाजातील वास्तवात जगत असते त्यामुळे या सामाजिक वास्तवाचा वेध घेऊन निरीक्षण करून कादंबरीची निर्मिती करीत असते. व्यक्तिजीवनाला समाजाशिवाय अर्थ प्राप्त होत नाही. व्यक्ती - कुटुंब - समाज यांच्या संबंधचित्रणाबरोबरच मानवी मनाचाही शोध घेतला जातो.

प्रत्येक कादंबरी ही स्वतंत्रपणे अवतरत असते. नवी कादंबरी जुने तंत्र स्वीकारील असे नाही. पारंपरिक रचनातंत्रातील काही परंपरा स्वीकारून नवीन मानदंड निर्माण करते. याविषयी रवींद्र ठाकूर लिहितात, "प्रत्येक कादंबरी ही आपला स्वतंत्र असा घाट घेऊनच अवतरते याचा अर्थ कादंबरी हा वाङ्मयप्रकार कादंबरीची रचनाविषयक परंपरा हेतुत: अनुसरीत नाही असा नसून नव्या कादंबरीला पारंपरिक रचनाविषयक तंत्र आपल्या नव्या आशयद्रव्याच्या अभिव्यक्तिसाठी सुयोग्य वाटेलच असे नाही असा आहे. नव्या कादंबरीचे आशयद्रव्य आपला नवा घाट घेऊनच अवतरते. येणारी नवी कादंबरी परंपरा अनुसरीतच नाही असे नाही. कादंबरीचे शाश्वत असे घटक तिच्यातच असतातच परंतु पारंपरिक रचनातंत्रातील घटकांचा सांकेतिकपणे स्वीकार न करता परंपरा पचवून नवीन कादंबरीनिर्मितीचे नवे मानदंड निर्माण करते."[१३]

सारांश, साहित्यविश्वातील प्रधान साहित्य प्रकार म्हणून ओळखला जाणारा 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार आधुनिक काळात उदयाला आला आहे असे मानले जात असले तरी कादंबरीचे बीज हे प्राचीन ग्रंथात सापडले आहे. 'कथेचे दीर्घरूप म्हणजे

कादंबरी' अशी व्याख्या रूढ होत गेली. १८२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोश' या ग्रंथात 'कादंबरी' या शब्दाचे अर्थ देताना 'एक कल्पित कथा'[१४] असा एक अर्थ दिला आहे. प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या मते, "एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीमध्ये बऱ्याच आधीपासून रूढ असावे."[१५] याचा अर्थ मराठी कादंबरीचा इतिहास फार जुना आहे.

**❖ मराठी कादंबरी: -**

इ. स. १८१८ मध्ये पेशवेकाळाचा अंत झाला. इंग्रज राजवट सुरू झाली. इंग्रज सरकारने एक क्रांतीच घडवून आणली. आपल्या देशात इंग्रजांनी शिक्षणाचा प्रसार झपाटयाने सुरू केला. शाळा महाविद्यालये सुरू करून ज्ञानाची गंगा सर्व दूरपर्यंत पसरवली. शिक्षणाचा पाया भक्कम केला. शिक्षणामुळे समाजात वैचारिक क्रांती घडून आली. इंग्रज सरकारने शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणला. मुद्रणाची सोय उपलब्ध करून दिली. शिक्षणाच्या प्रसारामुळे वाचक निर्माण होत गेले. दिवसेंदिवस वाचकांची संख्या वृध्दिंगत होत गेली. सुशिक्षित वर्गाला वाचनाची आवड निर्माण झाली. इंग्रजी भाषेतील वाङ्मय अनुवादित होऊन मराठीमध्ये येऊ लागले. इंग्रजीशिवाय अरबी, हिंदी, बंगाली भाषेतीलही अनुवाद मराठीत प्रसिध्द होऊ लागले त्यातूनच मराठी कादंबरीचा उदय झाला.

मराठी कादंबरीच्या उदयापासून मराठी कादंबरी ही विविध टप्प्यातून आपला प्रवास करीत आली आहे. मराठी कादंबरीचा जसजसा विकास होत गेला तसतसे नवनवे प्रवाह निर्माण झाले. या प्रवाहांना बरोबर घेऊनच मराठी कादंबरीविश्व चढउताराने विस्तारत गेले. मराठी कादंबरीचा अभ्यास करताना कालखंडानुसार विचार करावयाचा आहे.

**❖ इ. स. १८०० ते १८७४ मधील प्रारंभिक कादंबरी: -**

मराठी कादंबरी वाङ्मयाचा पाया 'हरि केशवजी पाठारे' यांनी 'यात्रिकक्रमण' या भाषांतरित कादंबरीने रचला. 'बनियनच्या' 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' या ग्रंथाचे मराठीत भाषांतर इ. स. १८४१ मध्ये केले. येथूनच मराठी कादंबरीचा प्रवाह वहात राहिला आहे. तत्कालीन काळातील मराठी कादंबरी बाल्यावस्थेत होती. एक म्हणजे भाषांतरित कादंबरीची निर्मिती झाली आणि दुसरे म्हणजे महाराष्ट्राची परिस्थिती अभिरूचीच्या दृष्टीने अनुकूल झाली होती. इ. स. १८०० ते १८७४ या कालखंडात 'कादंबरी' या वाङ्मयाचा पाया रचला गेला हे निश्चितच मान्य करावे लागेल.

मराठी वाङ्मयातील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून बाबा पद्मनजी

यांनी लिहिलेल्या 'यमुनापर्यटन' (१८५७) या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. सामाजिक प्रश्नांवर दृष्टिक्षेप टाकणारी ही कादंबरी समीक्षकांच्या दृष्टीने वादग्रस्त ठरली. या कादंबरीत विधवा स्त्रियांची दु:खे मांडलेली आहेत. त्याचबरोबर ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचा पद्मनजी यांचा हेतू असावा असे दिसून येते. म्हणूनच कदाचित या कलाकृतीला 'कादंबरी' म्हणून सर्वमान्यता मिळालेली नाही. तरीही कादंबरी वाङ्मयाचा पायंडा मात्र या कलाकृतीने घालून दिला हे निश्चितच आहे.

याच कालखंडात ऐतिहासिक कादंबऱ्यांचे नवे पर्व निर्माण झाले. ऐतिहासिकदृष्टया हा कालखंड महत्त्वाचा मानला जातो. रा. भि. गुंजीकर यांनी 'मोचनगड' (१८७१) ही पहिली ऐतिहासिक कादंबरी निर्माण केली. शिवकालाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही कादंबरी ऐतिहासिकदृष्टया महत्त्वपूर्ण ठरते. विष्णू पटवर्धनांनी 'हंबीरराव आणि पुतळाबाई' (१८७३) ही कादंबरी १८५७ च्या बंडाशी निगडित असणारी अशी लिहिली आहे. तिसरी ऐतिहासिक कादंबरी श. मो. रानडे यांची 'शिलादित्य' (१८८४) ही कादंबरी आंध्रप्रदेशातील घटनांवर आधारलेली आहे.

ऐतिहासिक कादंबऱ्या निर्मितीबरोबरच काही पौराणिक बखरी निर्माण होऊन कादंबरी वाङ्मयाला काही प्रमाणात हातभार लागलेला दिसून येतो. इ. स. १८४५ मध्ये 'बकासुराची बखर', इ. स. १८५४ मध्ये 'श्रीमद्‌भागवतगीताची संक्षिप्त बखर', इ. स. १८६१ मध्ये 'लव्हकुशाची बखर' अशा काही बखरीमधून इतिहास प्रकट झाला आणि कादंबरी वाङ्मय विस्तारू लागले.

ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या समकालीन काही अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांची निर्मिती व्हायला फारसा वेळ लागला नाही. वस्तुस्थितीचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या कादंबरीने अद्‌भूतरम्यतेचे रूप धारण करून एक परंपरा निर्माण केली आहे.

पहिली अद्‌भूतरम्य कादंबरी म्हणून 'लक्ष्मणशास्त्री हळबे' यांची 'मुक्तामाला' (१८६१) या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. मुक्तामालेला प्रसिध्दी मिळताच हळबे यांची दुसरी कादंबरी 'रत्नप्रभा' (१८७८) मध्ये प्रसिध्द झाली. पण मुक्तामालेइतकी रत्नप्रभाला प्रसिध्दी मिळाली नाही. मुक्तामालेनंतरची लोकप्रिय कादंबरी म्हणून ना. स. रिसबूड यांची 'मंजुघोषा' (१८६६) या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. सामाजिक व कौटुंबिक या पातळयांवर आधारलेली ही कादंबरी लोकप्रिय होते या कादंबरीच्या यशानंतर रिसबूड यांनी 'वसंतकोकिळा' कादंबरीची निर्मिती केली. त्यांची ही अपूर्ण कादंबरी त्यांच्या बंधूने पूर्ण केली. अद्‌भूत घटनांनी ठासून भरलेल्या या कादंबऱ्यांनी वाचकांना आकर्षित करून घेतले

होते. रिसबूड यांनी आणखी एक कादंबरी प्रसिध्द केली. 'विश्वासराव' (१८७०) ही सुध्दा अद्‌भूतरम्य अशीच कादंबरी निर्माण केलेली होती.

याच धर्तीवर आधारित अशा अनेक अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांची निर्मिती होऊन अद्‌भूतरम्य कादंबरी बहरली. वामन कृष्ण देशमुख यांनी 'सुहास्यवंदना' (१८७०) ही कादंबरी लिहिली. अण्णा मार्तंड जोशी आणि विनायक परशराम बाबरे या दोघांनी मिळून लिहिलेली 'चंपकमाला' (१८७१), रामचंद्र आबाजी राजे यांची 'विलासिनी' (१८७१) ही मुक्तामालेच्या कथानकाशी मिळतीजुळती असणारी कादंबरी निर्माण केली.

या सर्व अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांनी मुक्तामालेची परंपरा जोपासून समृध्द केली. पण त्याचबरोबर या कादंबऱ्यांना ऊतही आला. अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांविषयी का. बा. मराठे या समीक्षकांनी 'नावल व नाटक' या निबंधात कादंबऱ्यातील दोष दाखवून 'नावलाची कीड' वाढल्याची तक्रार केली ती अगदी योग्यच आहे.

अद्‌भूतरम्यतेचा कित्ता गिरवित आणखी काही कादंबरीकारांनी अद्‌भूतरम्य कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत. साळुबाई तांबवेकर यांची शृंगाराने नटलेली 'चंद्रप्रभाविरहवर्णन' (१८७३) ही प्रसिध्द झाली. नारायण योगी यांची 'प्रेमबंधन' (१८७४) ही संमिश्रित स्वरूपाची कादंबरी आहे. पांडुरंग पारखीशास्त्री यांनी 'मित्रछंद' ही अद्‌भूतरम्यतेबरोबरच सुसंबध्द आणि बांधेसूद अशी कादंबरी निर्माण केली. वासुदेव रामचंद्र मोहोनी यांची 'पीयूषभाषिणी व 'मदिरामंजिरी' (१८८३), व्य. आ. परब यांची 'क्लेशविमोचन' (१८८४), अण्णाजी इनामदार यांची 'मदनमंजिरी' (१८८५), ग. ना. गागण यांची 'मंजुळा' (१८८५), अ. के. दप्तरदार यांची 'राजपुत्र राजहंस' (१८८५), बाबा गोखले यांची 'राजा मदन' अशा अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांना समीक्षकांच्या दृष्टीने महत्त्व नसले तरी वाचकवर्गात अत्यंत लोकप्रिय झाल्या होत्या.

याच दरम्यान सामाजिक कादंबऱ्याचीही निर्मिती होऊन कादंबरी वाङ्मयात भर पडलेली दिसून येते. पहिली सामाजिक कादंबरी म्हणून बाबा पद्‌मनजी यांच्या 'यमुनापर्यटन' (१८५७) या कादंबरीचा उल्लेख केला जातो. अर्थात ही कादंबरी वादाच्या भोवऱ्यात सापडल्याने तिला कादंबरी म्हणून सर्वमान्यता मिळालेली नाही हेही तितकेच खरे आहे. दुसरी सामाजिक कादंबरी विनायक दामले यांची 'अवलिया' ही कादंबरी होय. या कादंबरीतून समाजातील कौटुंबिक प्रश्नांवर त्यांनी विचार मंथन केलेले आहे. याशिवाय विनायक ओक 'शिरस्तेदार' (१८८१), भा. के. गांगनाईक 'वधूदर्पणमाला' (१८८२), म. वि. रहाळकर 'नारायणराव आणि गोदावरी' (१८८४) अशा काही कादंबऱ्यातून सामाजिक प्रश्नांना हात घालण्याचा प्रयत्न केला

आहे तो लक्षणीय आहे. पण हरिभाऊंची 'मधली स्थिती' (१८८५) प्रसिध्द होईपर्यंत मराठी कादंबरीतील वास्तव समाजजीवनचित्र कोणत्याही कादंबरीने रेखाटलेले दिसून येत नाही.

या कालखंडात बोटावर मोजण्याइतक्याच सामाजिक कादंबऱ्या निर्माण झाल्या आहेत. सामाजिक, ऐतिहासिक, तसेच अद्‌भूतरम्यता या प्रकारातील काही कादंबऱ्यांचा अपवाद सोडता सर्वच कादंबऱ्या नीती बोधपर होत्या हे मान्य करावे लागेल.

थोडक्यात, ऐतिहासिक, सामाजिक, अद्‌भूतरम्य कादंबऱ्यानी या कालखंडामध्ये कादंबरी या वाङ्मयाचा पाया रचून मोलाची भर घातलेली दिसून येते. १८०० ते १८७४ या कालखंडातील निर्माण झालेल्या कादंबरीने मराठी कादंबरी वाङ्मयाच्या प्रवाहास गती दिली

**❖ इ. स. १८७४ - १९२० या कालखंडातील नवनिर्मित कादंबरी: -**

इ. स. १८७४ ते १९२० हा कालखंड कादंबरी वाङ्मयाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. या कालखंडात नवविचारांचे अनेक कादंबरीकार उदयास आले. कादंबरीने साहित्य विश्वात स्वत:चे अस्तित्व निर्माण केले. या कालखंडामध्ये हरिभाऊ नारायण आपटे, वा. म. जोशी, बाळकृष्ण गडकरी, नाथमाधव, सहकारीकृष्ण आणि ना. ह. आपटे अशा अनेक कादंबरीकारांनी या कालखंडाची धुरा अत्यंत प्रामाणिकपणे सांभाळलेली दिसून येते. विशेषत: या कालखंडातील कादंबरी विविधांगी रूपाने रूजली आणि तिचा विकास होत गेला. प्रारंभीच्या काळातील कादंबरी अद्‌भूतता आणि मनोरंजनातच गुंतलेली दिसते. मात्र या कालखंडातील कादंबरीने वेगळी दिशा दिली. हळूहळू कादंबरी प्रगल्भ होऊ लागली. त्यामुळे कादंबरीचा विकास होत गेला असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

या कालखंडातील पहिले प्रमुख कादंबरीकार म्हणून 'हरिभाऊ आपटे' यांचा उल्लेख करणे महत्वाचे ठरते. तत्कालीन समाजाचे निरीक्षण तसेच आकलन करून कादंबरीत वास्तव समाजाचे चित्र रेखाटले आहे. याचा अर्थ हरिभाऊंनीच कादंबरीचा पाया घातला आहे असे म्हणावे लागेल. हरिभाऊंची प्रारंभिक कादंबरी 'मधली स्थिती' (इ. स. १८८५) ही भाषांतरित स्वरूपाची कादंबरी आहे. रेनॉल्डसच्या 'Mysteries of old London' या कादंबरीचे भाषांतर करून 'मधली स्थिती' असे मराठी नामांतर केले आहे. ह. ना. आपटे यांनी सामाजिक, ऐतिहासिक कादंबऱ्या निर्माण करून समाजामध्ये परिवर्तन घडविले आहे.

हरिभाऊ आपटे यांनी सामाजिक कादंबऱ्यातून वास्तव चित्र रेखाटले आहे.

'गणपतराव' (१८७७ - ८८), 'पण लक्षात कोण घेतो' (इ. स. १८९७), 'यशवंतराव खरे' (१८९२ - ९५), 'मी' (१८९३ - ९५), 'भयंकर दिव्य' (१९०३), 'मायेचा बाजार' (१९१० - १९१२), 'कर्मयोग' (१९१३ - १७), 'जग कसे आहे या सर्व सामाजिक कादंबऱ्यातून सामाजिक विचार नीतीमत्ताबोधवादी विचार देण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक कादंबऱ्याशिवाय आपटयांनी ऐतिहासिक कादंबऱ्याही निर्माण केल्या आहेत. 'उष:काल' (१८९५ - ९७), 'म्हैसूरचा वाघ' (१८९० - ९१), 'केवळ स्वराज्यासाठी (१८९८ - ९९), 'रूपनगरची राजकन्या' (१९०० - १९०२), 'गड आला पण सिंह गेला' (१९०३), 'चंद्रगुप्त' (१९०२ - १९०४), 'सूर्योदय' (१९०५ - १९०८), 'मध्यान्ह' (१९०६ - १९०८), 'सूर्यग्रहण' (१९०८ - १९०९ अपूर्ण कादंबरी), 'कालकुट्ट' (१९०९ - १९११ अपूर्ण कादंबरी), 'वज्राघात' (१९१३ - १९१५) इत्यादी कादंबरीतून शिवकालीन रजपुतांचा इतिहास, भारताचा प्राचीन इतिहास सांगितला आहे. आपटयांनी मराठी कादंबरी सर्वांगाने समृध्द केली असे म्हणणे उचित ठरते.

हरिभाऊंचे समकालीन दुसरे कादंबरीकार म्हणून 'वा. म. जोशी' यांनी आपल्या चिंतनात्मक कादंबऱ्या निर्माण करून एक छाप पाडलेली दिसून येते. 'रागिणी' (१९१५), 'नलिनी' (१९१९), 'आश्रमहरिणी' या कादंबऱ्यांतून वेगवेगळया स्त्री स्वभावाचे चित्रण केले आहे. 'सुशिलेचा देव' (१९३०), 'इंदू काळे सरला भोळे' (१९३५) या कादंबऱ्यांतून धाडसी स्त्रियांचे चित्रण केले आहे. 'पहिले महायुध्द संपले' (१९१९), 'टिळक युगाचा अस्त झाला' (१९२०) या दोन कादंबऱ्यांवर गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद त्याचबरोबर फ्राईडच्या मानसशास्त्राचा प्रभाव दिसतो. जोशींच्या कादंबऱ्यांनी नीतीबोध ज्ञानप्रबोधन करण्याचे कार्य केलेले दिसून येते.

आपटे आणि जोशी यांच्या नंतर कादंबरीला 'बाळकृष्ण गडकरी' या कादंबरीकाराने नवी उभारी देण्याचे कार्य केले. त्यांनी 'सुधारणेचा मध्यकाल', 'दुर्दैवी प्रेमयोग' या दोन कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत.

हरिभाऊंचा आदर्श घेऊन ना. ह. आपटयांनी सामाजिक, ऐतिहासिक कादंबऱ्यांची निर्मिती केली आहे. 'कपटजाल', 'भाग्यश्री', 'समर्थशिष्य', 'वैभवाच्या कोंदणात', 'लांछित चंद्रमा' या ऐतिहासिक कादंबऱ्यातून नैतिक भूमिका मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. याशिवाय 'पहाटेपूर्वीचा काळोख', 'सुखाचा मूलमंत्र', 'याला कारण शिक्षण' या कादंबऱ्यांनी कादंबरी वाङ्मयात भर घातली.

हरिभाऊनंतर ऐतिहासिक कादंबरी समृध्द करणारे कादंबरीकार म्हणजे

'नाथमाधव' हे होत. 'सायंकालची करमणूक' (१९०५), 'प्रेमवेडा' (१९०५), 'विहंगवृंद', 'सुहासिनी रायक्लब', 'गृहदशेचा फेरा', 'प्रेम आणि सूड', 'दोन भावंडे', 'दैवाचे खेळ', 'देशमुखवाडी', 'विमलेची गृहदशा', 'डॉक्टर' इ. सामाजिक कादंबऱ्यातून बोधवादी विचार दिला आहे. सामाजिक कादंबऱ्यांपेक्षा ऐतिहासिक कादंबऱ्यांना अधिक लोकप्रियता मिळाली. 'स्वराज्याचा श्रीगणेशा' (१९२१), 'स्वराज्याची स्थापना' (१९२२), 'स्वराज्याचा कारभार' (१९२३), 'स्वराज्याची घटना' (१९२५), 'स्वराज्याचे परिवर्तन' (१९२८), 'स्वराज्यातील दुफळी' (१९२८), 'स्वराज्यावरील संकट' (१९३०), 'स्वराज्याची समाप्ती' इत्यादी ऐतिहासिक कादंबऱ्यातून स्वराज्याची अस्मिता जपण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. याशिवाय 'वीरधवल' (१९१३), 'सावळया तांडेल' (१९१४), या कादंबऱ्या लिहून कादंबरी वाङ्मयात भर घातली आहे.

सहकारी कृष्ण यांनी 'माझी कहाणी', 'हा संसार की नरकवास', 'आत्मोध्दार' इत्यादी सामाजिक कादंबऱ्यातून तत्कालीन समाजाचे चित्र रेखाटून समाजजागृती केली आहे.

सारांश, १८७४ ते १९२० हा कालखंड विशेषत: नवनिर्मित विचारांचा कालखंड ठरला. या कालखंडाचे मुख्य वैशिष्टय म्हणजे समाजजागृती घडवून आणली. सामाजिक, ऐतिहासिक, कौटुंबिक, सुशिक्षित स्त्रियांचे प्रश्न, विधवांचे प्रश्न असे अनेक गंभीर स्वरूपाचे विषय कादंबरीने हाताळले आहेत. समाजवास्तवाचे सत्य चित्र रेखाटून हा कालखंड मुख्यत्वे या कादंबरीकारांनी समृध्द केला असेच म्हणावे लागेल.

### ❖ इ. स. १९२० - १९४५ या कालखंडातील परिवर्तनीय विचारवादी कादंबरी: -

इ. स. १९२० नंतर नवे पर्व सुरू झाले. १९२० मध्ये टिळकयुगाचा अस्त होऊन गांधीयुगाचा प्रारंभ झाला आणि समाजपरिवर्तन होऊ लागले. राजकीय सामाजिक सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडले. या साऱ्या घटनांचा परिणाम समाजावर झाला. तसा तो साहित्यावरही झाला. एक नवा दृष्टिकोन, एक वेगळे वळण घेऊन कादंबरी जन्माला आली.

या कालखंडामध्ये अनेक कादंबरीकार निर्माण झाले. आपल्या कादंबरीलेखनाने मराठी साहित्यात मोठी भर घातलेली दिसून येते. श्री. व्यं. केतकर, प्रा. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, पु. य. देशपांडे, ग. त्र्यं. माडखोलकर, मामा वरेरकर, दा. न. शिखरे, वि. वि. बोकील, मो. ग. रांगणेकर,

द. र. कवठेकर, रघुवीर सामंत अशा अनेक कादंबरीकारांनी मराठी कादंबरीत महत्वाचे योगदान देऊन मराठी कादंबरी यशाच्या शिखरावर नेऊन पोहचविली आहे.

या कालखंडातील पहिले कादंबरीकार म्हणून श्री. व्यं. केतकर यांचा उल्लेख करावा लागेल. 'गोंडवनातील प्रियवंदा' (१९२६), ' परागंदा' (१९२६), 'आशावादी' (१९२७), 'गांवसासू' (१९३०), 'ब्राह्मणकन्या' (१९३०), 'विचक्षणा' (१९३६) इत्यादी कादंबऱ्यांतून तत्कालीन परिस्थितीचे चित्रण करून सामाजिक समस्या आणि समस्यामधील गतिशीलता दाखविली आहे.

साहित्यसम्राट 'न. चिं. केळकर' यांनी 'नवलपूरचा संस्थानिक', 'बलिदान', 'कोकणचा पोर', 'कावळा आणि कपी' या कादंबऱ्यांतून बोध करून स्वत:चा असा वेगळा ठसा उमटविलेला आहे.

या कालखंडातील प्रसिध्द कादंबरीकार म्हणून ना. सी. फडके यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी सुमारे ७० कादंबऱ्या निर्माण करून कलावाद जोपासला आहे. 'जादूगार' (१९२८), 'दौलत' (१९२९), 'अटकेपार' (१९३१) अशा अनेक कादंबऱ्यांतून प्रेम भावनेचा आविष्कार केलेला दिसून येतो. 'निरंजन' (१९३२) मध्ये प्रसिध्द झालेल्या कादंबरीतून राजकीय आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कथानक गुंफलेले दिसते. 'कलंकशोभा' (१९३३), 'उध्दार' (१९३५), 'काश्मिरी गुलाब' (१९३६), 'इंद्रधनुष्य' (१९४१), याशिवाय 'गुप्त प्रायश्चित' (१९४१), 'वादळ' (१९४१) या दोन रूपांतरित कादंबऱ्या लिहून कादंबरीविश्वाला मोलाचे योगदान दिले आहे.

फडक्यांच्या कलावादाला फाटा देऊन जीवनवादाचा पुरस्कार करणारे वि. स. खांडेकर याच कालखंडात उदयास आलेले कादंबरीकार होत. आपल्या प्रतिभाशैलीने वाचकात अत्यंत लोकप्रिय झालेल्या खांडेकरांनी कादंबरीला फुलविण्याचे मोलाचे कार्य केले. खांडेकरांच्या कादंबऱ्यांवर गांधीवादाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. 'हृदयाची हाक' (१९३०) ही त्यांची पहिली कादंबरी होय. 'कांचनमृग' (१९३१), 'दोन धृव' (१९३४), 'उल्का' (१९३४), 'हिरवा चाफा' (१९३८), 'दोन मने' (१९३८), 'रिकामा देव्हारा' (१९३९), 'सुखाचा शोध' (१९३९), 'पांढरे डाग' (१९३९), 'पहिलं प्रेम' (१९४०), 'क्रौंचवध' (१९४२), 'अश्रु' (१९५३) अशा सर्व कादंबऱ्यातून ध्येयवाद आणि आदर्शवाद जोपासण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

फडके - खांडेकर या दोन कादंबरीकारांप्रमाणे आणखी एका कादंबरीकाराने

मराठी कादंबरीला हातभार लावला आहे. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'मुक्तात्मा' (१९३३) ही पहिली कादंबरी लिहिली. 'भंगलेले देऊळ' (१९३४), 'कांता' (१९३९), 'दुहेरी जीवन' (१९४०), 'नागकन्या' (१९४१), 'नवे संसार' (१९४१), 'डाकबंगला' (१९४२), 'चंदनवाडी' (१९४३) अशा अनेक राजकीय तसेच सामाजिक कादंबऱ्या निर्माण करून राजकारण आणि प्रणय याचे दर्शन घडविले आहे.

थोडक्यात फडके - खांडेकर - माडखोलकर या कादंबरीकारांनी या कालखंडात मराठी कादंबरी आकारास आणली असे म्हणावयास हरकत नाही. या कादंबरीकारांशिवाय आणखी काही कादंबरीकारांनीही कादंबरीविश्वाचा विकास केला आहे. त्यांचा उल्लेख येथे करणे क्रमप्राप्त ठरेल.

मामा वरेरकर 'चिमणी' (१९२६), 'विधवा कुमारी' (१९२८), 'गोदू गोखले भाग १ व २' (१९३२ - ३३), 'धावता धोटा' (१९३३), 'परतभेट' (१९३४), 'फाटकी वाकळ' (१९४१), 'मी रामजोशी' (१९४३), या कादंबऱ्यांनीही वाचकांचे लक्ष वेधून घेतले.

या कादंबरीकारांशिवाय अन्य काही कादंबरीकारांनी बहुसंख्य कादंबरीलेखन करून विविध विषय हाताळलेले आहेत. दा. न. शिखरे, वि. वि. बोकील, मो. ग. रांगणेकर, दिवाकरकृष्ण, द. र. कवठेकर ,रघुवीर सामंत इत्यादी कादंबरीकारांचा प्रामुख्याने समावेश होतो. या कालखंडाचा आणखी एक विशेष म्हणजे पुरूषाप्रमाणे स्त्रियांनीही कादंबरीलेखन करून कादंबरीची वाटचाल पुढे नेण्यास हातभार लावला. काशीताई कानिटकर, गीता साने, जानकीबाई देसाई, कमलाताई सोहोनी, शांताबाई नाशिककर, कमलताई बंबवाले अशा काही स्त्री लेखिकांनी वैवाहिक जीवनातील समस्यांचे चित्रण केले आहे. पण याच दरम्यान एक वेगळी प्रतिभाशाली लेखिका निर्माण होते ही अभिमानास्पद बाब आहे. विभावरी शिरूरकर यांनी आपल्या कादंबऱ्यातून एक वेगळा ठसा उमटविला आहे. 'हिंदोळयावर' (१९३४) ही त्यांची पहिली कादंबरी स्त्रिच्या मनाची झालेली व्दिधा अवस्था व्यक्त करताना दिसते. 'विरलेले स्वप्न' (१९३५), 'बळी' (१९५०) या कादंबऱ्यांनी वाचकाचे लक्ष एका वेगळया अनुभवविश्वाकडे वळवून घेतले.

या कालखंडामध्ये फडके - खांडेकर यांच्या लेखनाचा प्रभाव अधिक जाणवतो. या कालखंडातील कादंबरी स्वप्नरंजनाच्या मोहात गुरफटलेली दिसते. काय सांगितले यापेक्षा कसे सांगितले याला अधिक महत्व दिले गेल्याने ती एका

चौकटीत बंदिस्त झाली. या कालखंडातील कादंबऱ्यावर गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद, फ्राईड यांचा प्रभाव अधिक दिसून येतो याला एखादी कादंबरीच अपवादात्मक ठरते. 'रणांगण' (१९३९) ही विश्राम बेडेकर यांनी वेगळया धर्तीची कादंबरी प्रसिध्द करून एक नवीन प्रयोग केला आहे. या कादंबरीने एक वेगळा अनुभव वाचकांना दिला असे म्हणावे लागेल. हा कालखंड कादंबरीच्या बहराचा कालखंड मानला गेला असला तरी तिचा विकास मात्र झालेला दिसून येत नाही. फडके - खांडेकर - माडखोलकर या कादंबरीकारांनी पूर्वीचाच कित्ता गिरवित कादंबरी लेखन केले आहे.

१९४० नंतर मात्र मराठी कादंबरीत नवनवीन प्रयोग होऊ लागले. बेडेकरांनी केलेला नवप्रयोग नवदिशा देणारा असूनही फडके - खांडेकर - माडखोलकर यांच्या जोखडातून कादंबरी मुक्त झाली नाही हेही तितकेच खरे आहे. एखाद दुसरी कादंबरी वगळता या कालखंडातील कादंबरी सुखस्वाप्नातच रंगलेली दिसते. याच काळात र. वा. दिघ्यांनी 'पाणकळा' (१९३९) ही प्रादेशिक स्वरूपाची कादंबरी निर्माण करून नवदिशा दिली. याच दरम्यान बा. सी. मर्ढेकर यांनी व्यक्तीमनातील गुंतागुंत संघर्ष याचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. 'रात्रीचा दिवस', 'तांबडी माती' (१९४३) आणि 'पाणी' (१९४८) या कादंबऱ्यातून नवविचार मांडला.

सारांश, या कालखंडात कादंबऱ्या भरपूर प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. संख्येने वाढलेल्या कादंबऱ्या मात्र वाङ्मयाचा विकास करू शकल्या नाहीत हे मान्य करावे लागेल. या कालखंडाचा आणखी एक विशेष म्हणजे अनेक स्त्रीलेखिकांचा उदय झाला. कादंबरी वाङ्मयाच्या प्रारंभिक कालखंडात एखाद - दुसरी स्त्री कादंबरीकार निर्माण झालेली दिसते. मधल्या काळात मात्र कुठेही स्त्री कादंबरीकारांचा उल्लेख असल्याचे आढळत नाही मात्र या कालखंडात अनेक स्त्री कादंबरीकारांनी कादंबरी वाङ्मयात भर घातलेली दिसून येते. अशा तऱ्हेने या कालखंडाचा प्रवाह वेगवेगळया वाटेने वाहताना दिसतो.

### ❖ इ. स. १९४५ - १९६० मधील कादंबरीप्रवाह: -

या कालखंडातील कादंबरी वाङ्मयावर पहिले महायुध्द, साम्यवादी, मार्क्सवादी विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. मराठी कादंबरीत अनेक स्थित्यंतरे घडली. नवनवीन प्रवाह उदयास येऊ लागले. या कालखंडात समग्र क्रांती झाली. कादंबरीविश्वात नव्या विचारांचे वारे वाहू लागले. राष्ट्रीय अस्मिता, भारताला मिळालेले स्वातंत्र्य या साऱ्या बाबींचा परिणाम साहित्य क्षेत्रावरही झाला. विशेषत: कादंबरी या वाङ्मयावर अधिक परिणाम झाल्याचे दिसते. हा कालखंड

स्वातंत्र्योत्तर कालखंड म्हणून ओळखला जाऊ लागला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षण प्रसार झाला. साक्षरतेचे प्रमाण वाढले. मासिके, ग्रंथालये, दिवाळी अंक यांची संख्या वाढली. मासिकातून कादंबऱ्या क्रमश: प्रसिध्द होऊ लागल्या. स्वप्नरंजनातून बाहेर येऊन वास्तवाचा वेध घेणारी कादंबरी नवजाणिवा, संवेदना, भान देण्याचे कार्य करू लागली. तरीही स्वातंत्र्योत्तरची कादंबरी पहिल्या काही वर्षात फडके - खांडेकरांपासून फारशी दूर गेलेली दिसत नाही. कथा कवितांतून बा. सी. मर्ढेकर, गंगाधर गाडगीळांनी नवे बंड पुकारले होते. पण दुर्दैवाची बाब अशी की, कादंबरीच्या बाबतीत असे बंड कुणीही पुकारल्याचे आढळत नाही. हे जरी खरे असले तरी या काळात अनेक वाङ्मयीन वाद निर्माण झाले हे मान्य करावे लागेल. गुलामगिरीचे जोखड फेकून स्वतंत्र झालेल्या स्त्रियांनी कादंबरी लेखन केले. 'बळी' सारखी कादंबरी निर्माण करून विभावरी शिरूरकरांनी कादंबरीविश्वाला एक जबरदस्त धक्का दिला.

एकीकडे स्वातंत्रप्राप्तीनंतर राष्ट्रीय अस्मिता जागृत झाली, औद्योगिकीकरण झाले त्याचबरोबर बकाल जीवन, भ्रमनिरास, मनोविश्लेषण, मार्क्सवाद या साऱ्यांचा परिणाम या कादंबऱ्यांवर झाला तर दुसरीकडे ग्रामीण जीवन प्रवाही होऊ लागले.

१९४५ नंतर मराठी कादंबरीत ग्रामीण कादंबऱ्यांचे पहिले पर्व सुरू झाले. श्री. ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, बा. भ. बोरकर, रणजित देसाई, गो. नी. दांडेकर, र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ या लेखकांनी ग्रामीण कादंबरीची धुरा सांभाळली.

ग्रामीण कादंबरी वाङ्मयाचा सविस्तरपणे विचार आपण करणार आहोत.

### ❖ इ. स. १९६० नंतरची मराठी कादंबरी: -

इ. स. १९६० हे वर्ष महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे ठरले. इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्यनिर्मिती होऊन सामाजिक राजकीय सांस्कृतिक चळवळींना उधान आले. या चळवळीचा परिणाम साहित्यावरही झाला. १९६० नंतर नवविचारांचे लेखक निर्माण झाले. ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहातील दुसरी पिढी निर्माण होऊन कादंबरी वाङ्मयात मोलाची भर घातली असेच म्हणावे लागेल.

याच काळात कादंबरी निर्माण होत असताना ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, स्त्रीवादी असे ठळक प्रवाह निर्माण होऊन कादंबरीचे क्षितीज विस्तारले गेले असे म्हणणे उचित ठरेल.

हरिभाऊ आपटे, नाथमाधव यांच्या नंतर वि. वा. हडप या ऐतिहासिक कादंबरीकाराचा उल्लेख करावा लागेल. हडपांनी पेशवाईच्या इतिहासावर एकूण चौदा कादंबऱ्या लिहिल्या. 'कादंबरीमय पेशवाई' चे जनक म्हणून त्यांना ओळखले जाते.

रणजित देसाईनी 'राधेय', 'स्वामी', 'श्रीमान योगी' तर शिवाजी सावंत यांनी 'मृत्युजंय', 'युगंधर' या पौराणिक कादंबऱ्यातून महामानवतील माणूस शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

याशिवाय 'छावा' (शिवाजी सावंत), 'बया बया दार उघड', 'दर्या भवानी', 'झुंझारमाची' आणि 'हे तो श्रींची इच्छा' (गो. नी. दांडेकर ) इत्यादी कादंबऱ्यातून शिवकालीन इतिहास उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. ना. स. इनामदार, स. श. देसाई, कॅप्टन बेलवलकर, भीमराव कुलकर्णी या कादंबरीकारांनीही ऐतिहासिक कादंबऱ्या निर्माण करून मोलाचा वाटा उचलला आहे.

या काळात ऐतिहासिक कादंबऱ्यांपेक्षा पौराणिक कादंबऱ्याना भरघोस असे यश प्राप्त झाले आहे. ग्रामीण कादंबरीचे क्षितीज विस्तृत करण्याचे प्रयत्न अनेक कादंबरीकारांनी केले आहेत. ग्रामीण कादंबरीचा सविस्तरपणे विचार करणार आहोत.

सारांश, आजच्या कादंबरीचे स्वरूप संमिश्रित आहे. कादंबरीत अनेकदा उथळपणा दिसतो. कादंबरीतील कथेचा बांधेसूदपणा हरवला आहे. शैलीचे नेमकेपण लोप पावल्याचे दिसते. प्रयोगशिलतेबरोबरच विस्कळीतपणा, विसंगत जीवनदर्शन या कादंबऱ्यातून दिसून येते.

**❖ कादंबरीचे स्वरूप आणि व्याख्या: -**

'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार एक महत्त्वाचा प्रकार म्हणून विकसित पावला गेला. 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराने स्वत:चे अस्तित्व निर्माण केले. 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराचा स्वतंत्रपणे अभ्यास समीक्षकांनी सुरू केला. कादंबरीचे स्वरूप तिच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. तथापि कादंबरी ही लेखकाचा एक आत्मशोध असते. ती लेखकाच्या आत्मभानातून निर्माण झालेली असते. समाज परिवर्तन झाले काळ बदलला तसे कादंबरीचे स्वरूप, तंत्रही बदलत गेले. जीवनप्रवाहाबरोबर चालणारा, बदलणारा हा साहित्यप्रवाह विविधांगी आहे.

कादंबरीचे मूळ स्वरूप तिच्या प्रकृतीतच आहे. या संदर्भात उषा हस्तक म्हणतात, " लयबध्द शब्दरचना हे जसे कवितेचे एक अंगभूत वैशिष्टय मानता येते तसे कादंबरीमध्ये तिच्या घडणीच्या संदर्भात दृग्गोचर होणारे एकही वैशिष्टय दाखवता येत नाही. म्हणूनच तिच्या पृथगात्मक रूपाचे मर्म अचूकपणे पकडणारी काटेकोर

व्याख्या सिध्द करता येत नाही तिची व्याख्या करण्यात ज्या अडचणी उद्भवतात त्याचे मूळ तिच्या प्रकृतीधर्मातच दडलेले आहे असे म्हणावे लागते."[१६] कादंबरीचे स्वरूप निश्चित करण्यासाठी काही निकष मानले गेले. या निकषांनी युक्त कादंबरीचे स्वरूप स्पष्ट होते. कोणत्याही एका वैशिष्टयानुसार कादंबरी निर्माण होत नाही तर भिन्न भिन्न वैशिष्टयानुसार कादंबरी निर्माण होते असे म्हणावयास हरकत नाही. या वैशिष्टयानुसार कादंबरीच्या स्वरूपाची कल्पना स्पष्टपणे येऊ शकते.

**१. विषय: -**

कादंबरी या वाङ्मयप्रकारात 'विषय' हा अतिशय महत्त्वाचा घटक मानला जातो. कारण लेखकाला एखाद्या घटनेतून किंवा प्रसंगातून सुचलेल्या कथानकातूनही एखादा विषय सुचू शकतो.

**२. कथानक: -**

'कथानक' हा कादंबरीचा मुख्य गाभा असतो. कथानकात आरंभ, मध्य, अंत असतो. कथानकाच्या माध्यमातून विषय मांडला जात असतो. कथानकात सुसंघटितपणा, संभवनीयता, मौलिकता हे महत्त्वाचे गुण असतात. कथानक याचा अर्थ कादंबरीतील व्यक्तींची विशिष्ट सामाजिक वातावरणात घडलेली स्थिती होय. ॲरिस्टॉटल कथानकाला कथेचा आत्मा मानतो. कथानकात उपकथानकालाही महत्त्व असते. कथानक आणि उपकथानक या दोघांच्या गुंफणीतून आकर्षक कथा निर्माण होते. या संदर्भात प्रा. गंगाधर गाडगीळ म्हणतात, "कादंबरीची रचना संघराज्याच्या घटनेसारखी आहे. कादंबरीत अनेक केंद्रे असतात. स्वतंत्रपणे विकास पावणारी कथाबीजे असतात. वेगवेगळया घटकातून रचलेल्या स्वायत्त संघटना असतात. त्या संघटनांचा परस्परसंबंध असतो. पुष्कळदा तिच्यातील कथासूत्रे परस्परांच्या प्रगतीला मदत करतात. कोणत्याही कादंबरीतील या स्वायत्त अनुभव संघटनांचा परस्पर संबंध मात्र निश्चित असतो तसे नँसेल तर या संघटना कादंबरीत येणे अर्थशून्य असते."[१७] यावरून कथानक - उपकथानक यांचे परस्पर संबंध स्पष्ट होतात. कथानकावरच कादंबरीची उभारणी होत असते आजच्या कादंबरीत कथानकाचे महत्त्व कमी आणि व्यक्तिकथांना महत्त्व अधिक प्राप्त झालेले दिसून येते.

**३. वातावरण: -**

वातावरण निर्मितीमुळे व्यक्तिरेखांचे वर्तन कळून येते. 'वातावरण' हा लक्षणीय असा विशेष मानला जातो. लेखक हा आपल्या कल्पनेच्या प्रतिभाशक्तीने

वातावरणनिर्मिती करत असतो. कादंबरीतील कथानक आणि व्यक्तिदर्शनाला उठावदारपणा प्राप्त करून देण्यासाठी वातावरण निर्मितीची आवश्यकता असते. वातावरणाच्या चित्रणाने कादंबरीला पार्श्वभूमी प्राप्त होत असते. उदाहरणार्थ सामाजिक कादंबरीत सामाजिक पार्श्वभूमीला, ऐतिहासिक कादंबरीत ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्व असते. कादंबरीत चित्रित केलेले वातावरण हे कथानक व व्यक्तिरेखा यातील रहस्य उलगडण्यास फार उपयुक्त ठरते.

**४. व्यक्तिरेखा (व्यक्तिदर्शन): -**

कादंबरीचे कथानक व्यक्तीच्या माध्यमातून साकार होत असते. त्यामुळे घटनांचे आकर्षण वाढते. कादंबरीच्या कथानकास महत्त्व प्राप्त होते ते व्यक्तिरेखामुळेच. व्यक्तिरेखा हीच केंद्रस्थानी मानली जाते. निवेदन, पात्र, संवाद या तिन्ही माध्यमातून कादंबरीत व्यक्तिदर्शन घडविले जाते. प्रमुख पात्रे व गौण पात्रांचे व्यक्तिदर्शन कादंबरीत घडविलेले असते. या व्यक्तिरेखांचे वागणे बोलणे हे त्याच्या स्वभावाशी सुसंगत असावे अशी वाचकांची अपेक्षा असते. विभिन्न स्वभावाच्या पात्रांच्या माध्यमातून मानवी जीवनाचे विश्लेषण व स्पष्टीकरण होत असते. व्यक्तिरेखांशिवाय कादंबरीची कल्पनाच करणे अशक्य असते म्हणूनच एक प्रधान घटक म्हणून व्यक्तिरेखेला महत्त्व असते.

**५. संवाद: -**

'संवाद' हे कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्टय मानले जाते. संवादातून व्यक्तीचे स्वभावदर्शन घडते. संवादामुळे कथानकाला रंगतदारपणा प्राप्त होतो. व्यक्तिरेखांच्या मनातील भावभावना संवादातून समजतात. कादंबरीत निवेदनाचा एक प्रकार म्हणून संवादाचा उपयोग केला जातो. वातावरण निर्मितीसाठी संवादाचा उपयोग केला जातो. चार्लस मार्गन या संदर्भात म्हणतात, " कथानकाला गतिमान करणे व्यक्तिदर्शन घडविणे आणि वातावरणनिर्मिती अथवा भाववृत्तीची निर्मिती करणे अशी संवादाची तीन कार्ये असतात."[१८] मराठी समीक्षक उषा हस्तक यांनी संवादाला मानवी जीवनाचे महत्त्वाचे अंग मानले आहे. या संदर्भात त्या लिहितात, " व्यक्तींच्या गरजांमुळे सभोवतालच्या जगाशी त्याचे अपरिहार्य संबंध निर्माण होतात. व्यक्तीचे अनुभवविश्व संवादातून साकार होत असते. या संबंधामागचे हेतू व स्वरूपे विविध असतात. या सर्व संबंधांना जोडण्याचे प्रयोजन आणि मानवी स्वरूप व्यक्त करण्याचे सुलभ प्रभावी माध्यम म्हणजे संवाद होत. संवाद मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे." [१९] संवादामध्ये बोजडपणा किंवा कृत्रिमता नसावी. संवाद वास्तवाभास निर्माण करणारे चटकदार असायला हवेत. निवेदन व संवाद यांची सांधेजोड कादंबरीत महत्त्वाची असते.

६. निवेदन: -

कादंबरीत निवेदनाला अतिशय महत्त्वाचे स्थान असते. निवेदनाच्या सहाय्यानेच कादंबरी वाचनीय ठरते. कादंबरीचे कथानक गतिमान करण्यासाठी निवेदनाची आवश्यकता असते.

७. भाषाशैली (भाषा): -

भावना आणि विचार व्यक्त करण्याचे माध्यम म्हणजे भाषा हे होय. कादंबरीत प्रत्येक पात्रानुसार भाषा वापरली जाते. कादंबरीतील पात्रे, निवेदन, संवाद, आणि प्रसंग यानुसार भाषा बदलत जाते. कादंबरी रचनेत भाषेला महत्त्वाचे स्थान असते. प्रत्येक लेखकानुसार भाषा, स्वरूप बदलत असते. उध्दव शेळक्यांनी कादंबऱ्यात विदर्भातील बोलीभाषा वापरली तर व्यंकटेश माडगूळकरांनी माणदेशातील भाषा वापरली आहे. अर्थात अलिकडे ही बोलीभाषा निवेदनावर अधिक प्रभाव टाकू लागली आहे.

थोडक्यात वरील वैशिष्टयावरून कादंबरीचे स्वरूप स्पष्ट होते. कोणत्याही एका वैशिष्टयांनी कादंबरीचे स्वरूप स्पष्ट होत नाही.

कादंबरीच्या वैशिष्टयावरून कादंबरीच्या स्वरूपाची कल्पना स्पष्ट होते. या स्वरूपावरून समीक्षकांनी कादंबरीच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. खरेतर 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराच्या व्याख्येला एका वाक्यात बांधणे अशक्यप्राय आहे असेच म्हणावे लागेल. कादंबरीच्या विविध वैशिष्टयानुसार कादंबरीच्या व्याख्या केल्या आहेत.

पाश्चात्य साहित्यिकांनी 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराच्या केलेल्या व्याख्या.

१. विल्यम लिटील: -

"Novel is a fictitious prose narrative of considerable length in which characters and actions representative of real life are portrayed in a plot of more or less complexity. . . ."[२०]

२. अर्नेस्ट बेकर: -

"The interpretation of human life by means of factitious narrative in prose"[२१]

३. कॅथेरीन लिव्हर: -

"A Novel is the form of written prose narrative of considerable length involving the reader in an imagined real world which is new because it has been created by the author"[२२]

मराठी समीक्षकांनी 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराच्या केलेल्या विविध व्याख्या

१. अ. का. प्रियोळकर: -

" संस्कृत भाषेत बाणाची कादंबरी नावाची जी कल्पित बृहत्कथा आहे तशासारखा मराठीतील वाङ्मयप्रकार म्हणून मराठीतील कल्पित दीर्घकथेला कादंबरी हे नाव मिळाले."[२३]

२. प्रा. श्री. मा. कुलकर्णी: -

"कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्याव्दारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललितगद्यकथा म्हणजे कादंबरी"[२४]

३. प्रा. प्र. वा. बापट / ना. वा. गोडबोले: -

"सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबित जीवित घटना यांचे गोष्टीरूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्यवाङ्मयविभाग म्हणजे कादंबरी"[२५]

४. रा. ग. जाधव: -

"कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरणनिर्मिती, शैली इत्यादी घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तवजीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय"[२६]

५. ना. सी. फडके: -

"एखाद्या व्यक्तीची विशिष्ट इच्छा अनेक अडचणीतून आणि संकटातून मार्ग काढून कशी सिध्दीस गेली अगर तिची कशी मोडतोड झाली याची कहाणी म्हणजे कादंबरी"[२७]

६. स. गं. मालशे: -

"कादंबरी निखळ सत्यापेक्षा कमी लोकविलक्षण आणि म्हणून अधिक प्रातिनिधिक चित्रण करणारी असते"[२८]

७. श्री. ना. पेंडसे: -

"कादंबरी म्हणजे जीवनप्रवाहाचा सलग स्वयंपूर्ण छेद असतो"[२९]

थोडक्यात कादंबरीच्या स्वरूपावरून आणि तिच्या केलेल्या विविध व्याख्यांवरून असे म्हणता येईल की कादंबरी हा दीर्घ कथात्मक वाङ्मयप्रकार आहे. लेखक आपल्या प्रतिभाशक्तीने समाजाचे निरीक्षण करून समाजजीवन कादंबरीत मांडत असतो. समाज आणि व्यक्ती यांच्या परस्पर संबंधाचे चित्रण कादंबरीत येत असते.

कादंबरीच्या स्वरूपावरून अनेक समीक्षकांनी कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला असला तरीदेखील सर्वमान्य अशी व्याख्या करणे अजूनतरी शक्य झालेले नाही ही बाब नाकारता येणार नाही.

❖ **ग्रामीण कादंबरीचा उदय आणि वैशिष्ट्ये: -**

मराठी साहित्यविश्वात 'ग्रामीण' हा साहित्य प्रवाह खळखळणाऱ्या पाण्यासारखा वाहताना दिसतो. ग्रामीण साहित्याने अनेक चढ - उतार पार करीत आपला प्रवाह अखंड वाहता ठेवला आहे. कादंबरी, कविता, कथा यासर्व प्रवाहांना एकत्रित करून ग्रामीण साहित्याचा प्रवाह वेगवेगळया वाटेने जाताना दिसतो. आजच्या ग्रामीण साहित्याने एक उंची प्राप्त करून स्वत:चा असा एक वेगळा ठसा साहित्यात उमटवला आहे. ग्रामीण साहित्यनिर्मितीपासून आजपर्यंतच्या ग्रामीण साहित्याची वाटचाल यशस्वीपणे पार पडत आहे ही गौरवाचीच बाब म्हणावी लागेल.

❖ **ग्रामीण साहित्याच्या पाऊलखुणा: -**

मराठी साहित्यात 'ग्रामीण' ही संकल्पना सर्वसाधारणपणे १९२५ पासून उदयास आली असे मानले जात असले तरी प्राचीन साहित्यात काही 'ग्रामीणत्वाच्या' पाऊलखुणा सापडतात. प्राचीन काळात लोककथा अस्तित्वात होत्या या लोककथामधून काही प्रमाणात ग्रामीण जीवनाचे प्रकटीकरण केलेले दिसून येते. लोककथांचे संपादनकर्ते यु. म. पठाण यांनी एका माळवी कथेच्या संदर्भात मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, ". . . . माळवी लोककथेत ग्रामीण जीवन आणि मध्ययुगीन इतिहासाच्या तेजस्वी छटा प्रकट झाल्या आहेत."[३०]

दृष्टांतपाठानंतर ग्रामीण जीवनाचे चित्रण महाराष्ट्रात होऊन गेलेल्या

संतांच्या अभंगवाणीतून प्रकट होताना दिसते. उदा. संत सावतामाळी यांच्या 'आमुचि माळियाची जात | शेत लावु बागाईत'[३१] या अंभंगातून ग्रामीणत्वाची जाणीव होते या शिवाय नरहरि सोनारासारखे एखादे संत आपल्या व्यवसायाचा उल्लेख आपल्या अभंगातून करताना दिसतात. ग्रामव्यवस्थेतील दाहक जीवनाचे चित्रण अतिशय तीव्र शब्दात चोखामेळा मांडताना दिसतात.

या सर्व संतांची भाषा म्हणजे ग्रामीण भागात बोलली जाणारी भाषा आहे हे लक्षात येते.

सारांश, ग्रामीण जीवनाचे चित्रण करणे हा काही प्राचीन वाङ्मयाचा हेतू नव्हता त्यांच्या अभंगातून ग्रामीण जीवनाचे चित्रण सहजपणे येऊन जाते. अजाणतेपणे किंवा अस्पष्टपणे का होईना पण प्राचीन मराठी वाङ्मयात ग्रामीणत्वाच्या काही खुणा प्रकट झालेल्या दिसतात हे मान्य करावे लागेल.

### ❖ आधुनिक काळातील ग्रामीण साहित्य: -

एकोणिसावे शतक हे अनेक दृष्टीने महत्त्वाचे ठरते. या शतकाच्या पूर्वार्धात इंग्रजी शिक्षणामुळे महाराष्ट्रात नव्या जाणिवा निर्माण झाल्या तसेच नवविचार मंथन सुरू झाले. राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जडणघडणीत आमूलाग्र परिवर्तन घडले हे परिवर्तन साहित्यातही घडणे अपरिहार्यच होते. याच काळात महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक निर्माण झाले. महात्मा फुल्यांसारखे एक महान रत्न महाराष्ट्रात जन्मास आले. महात्मा फुल्यांनी मानवी हक्कासाठी आयुष्यभर लढा दिला. 'शेतकऱ्याचा आसूड' हा वैचारिक ग्रंथ लिहून ग्रामीण जीवनचित्रणाचा पहिला स्पर्श मराठी साहित्याला घडविला असे म्हणणे अधिक उचित ठरेल. 'शेतकऱ्याची दु:स्थिती आणि त्यावर उपाय याचे विवेचन या ग्रंथात केले आहे. या संदर्भात नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, " 'शेतकऱ्याचा आसूड' हा महात्मा फुल्यांचा ग्रंथ त्यांच्या चिंतनशीलतेची झेप किती उंच आहे हे दाखविणारा जरूर आहे पण, वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने तो सरस आहे याकडे मात्र कायम दुर्लक्ष झाले आहे"[३२] अशी खंत नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केली आहे. समीक्षकांच्या दृष्टिकोनातून दुर्लक्षित झालेला 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ ग्रामीण साहित्याचा पाया रचणारा ग्रंथ ठरला. ग्रामीण जीवनाचा प्रभावी आविष्कार करणारी महात्मा फुल्यांची शैली ही अतिशय अर्थघन अशी आहे.

महात्मा फुल्यांच्या विचारांचा प्रभाव असलेले कृष्णराव भालेकर या प्रभावी कार्यकर्त्याने शेतकऱ्यांचे प्रश्न 'दीनबंधू' तून मांडले. कृष्णराव भालेकरांनी 'बळीबा

पाटील' (१८८८) 'दीनबंधू' तून क्रमश: छापली होती. 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय' या ग्रंथाचे संपादक श्री. सीताराम रायकर यांनी ही कादंबरी १८८८ मध्ये जरी प्रसिध्द झाली असली तरी १८७७ मध्येच या कादंबरीचे लेखन पूर्ण झाले होते. 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' असे या कादंबरीचे नाव होते अशी नोंद केली आहे. स्फूट गोष्टीचे निर्माते ह. ना. आपटे यांनी 'काळ तर मोठा कठीण आला' (१८९८) या कथेतून खेडयातील ग्रामीण जीवनाचे मागासलेपण रूढी - परंपरा यांचे चित्रण केले आहे पण, हरिभाऊंच्या साहित्याला ग्रामीण मानले जात नाही.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी 'धनुर्धारी' यांनी लिहिलेल्या 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीने ग्रामीण जीवनाचे वास्तव रूप धारण केलेले दिसते. या कादंबरीत १९ व्या शतकाच्या शेवटच्या २० - २५ वर्षातील दुष्काळी खेडयाचे अतिशय वास्तवदर्शी आणि प्रभावी दर्शन घडविले आहे.

धनुर्धारी यांच्या 'पिराजी पाटील' या कादंबरीनंतर सुमारे २० वर्षे ग्रामीण साहित्याची निर्मिती झालीच नाही असे म्हणावे लागेल. महात्मा फुल्यांसारख्या थोर व्यक्तीच्या विचाराचा वारसा असूनही ग्रामीण साहित्यात एवढा मोठा खंड पडला आहे ही फार खेदाची गोष्ट आहे.

कृष्णराव भालेकर यांची 'बळीबा पाटील' (१८८८) आणि धनुर्धारीची 'पिराजी पाटील' (१९०३) या दोन्हीही कादंबऱ्यांवर महात्मा फुल्यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

### ❖ 'ग्रामीण' साहित्य संकल्पना: -

मराठी साहित्यात 'ग्रामीण' ही संज्ञा सर्वसाधारणपणे १९२५ पासून रूढ झाली आहे. कोणतीही संकल्पना किंवा संज्ञा एकदम अस्तित्वात येत नसते. त्यापाठीमागे कोणतीतरी पार्श्वभूमी असते अशीच पार्श्वभूमी 'ग्रामीण' या संज्ञेच्या निर्मितीमागेही आहे हे लक्षात घ्यायला हवे.

ग्राम म्हणजे खेडं. आपला भारत देश हा खेडयांचा देश आहे. सत्तर - ऐंशी टक्के समाज खेडयांमध्ये राहतो. शेतकरी हा खेडयातील प्रमुख घटक आहे. खेडयात राहणारा शेतकरी हा शेती आणि निसर्गाशी संबंधित असा घटक आहे. शेती व्यवसाय, निसर्गाचे सान्निध्य, तुरळक लोकवस्ती, एकजिनसीपणा, भौगोलिकता इत्यादी वैशिष्टयामुळे हा समाज शहरी जीवनापासून वेगळा ठरतो. या समाजाची स्वत:ची अशी संस्कृती निर्माण होऊन या खेडयाची रचना ही एका विशिष्ट पध्दतीनुसारच

रचलेली असते. या विशिष्ट पध्दतीच्या ग्रामव्यवस्थेच्या रचनेविषयी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात, "या देशातल्या अनेक राज्यव्यवस्था आल्या गेल्या परंतु, ग्रामव्यवस्था कायम राहिली"[३३]

'कृषिकेंद्रित रचना' हे ग्रामसंस्कृतीचे प्रमुख वैशिष्टय असल्याने ग्रामव्यवस्थेत शेतकरी हा प्रमुख घटक असतो. संपूर्ण 'गावगाडा' शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून निर्माण झाल्याचे दिसून येते. त्रि. ना. अत्रे यांनी ग्रामरचनेविषयीचे चित्र रेखाटले आहे ते असे, "खेडे म्हटले की अगोदर चटकन काळीच डोळयापुढे उभी राहते. शेते, पिके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळया - मेंढया, मेंढके, शेतकरी, गुराखे, पाट, बुडक्या, विहिरी, नांगर, कुळव, मोट, मळा, गोफण वगैरे. बळीराजाचे वैभव खेडयाचे नाव काढताच इतके मन व्यापून टाकते की, खेडयात शेतीखेरीज दुसरा व्यवसाय चालत असेल किंवा शेतकऱ्याखेरीज दुसरे कोणी रहात असेल असे एकाएकी मनातही येत नाही. कुणबी पुढे झाल्याखेरीज एकाही खेडयाची वसाहत झाली नाही. त्याने धान्य पैदा करून इतरांच्या खाण्याची तरतूद केली तेव्हा इतर गोळा झाले."[३४]

कृषिजीवनाशी निगडित असणारे सण - उत्सव साजरे केले जातात. ग्रामीण जीवन हे शेती, पाऊस, निसर्गातील घटक यांच्याशी निगडित असते. भारतीय शेती प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून असते. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी दैववादी बनतो आणि आदिमातेकडे झुकत असतो. ग्रामसंस्कृतीत कुटुंबव्यवस्थेला अधिक महत्त्व असते. शेतीसाठी लागणाऱ्या मनुष्यबळासाठी एकत्रित कुटुंबपध्दतीला महत्त्व असते पण, आजच्या काळात ही पध्दती कोलमडून पडलेली दिसते. ग्रामीण भागात परिवर्तन होत असले तरी जातिव्यवस्था नष्ट झालेली नाही प्रत्येक जातीची स्वत:ची अशी एक स्वतंत्र रचना असते, वेगवेगळी संस्कृती असते.

ग्रामीण व्यक्ती ही कुटुंबाला, कुटुंब जातीला, आणि जात गावगाडयाला बांधलेली असते. या साऱ्या विवेचनातून असे लक्षात येते की, माणसाच्या मनोविश्वाचे आणि व्यवहाराचे चित्र ग्रामीण साहित्यातून प्रकट होत जाते. ग्रामीण जीवनातील वास्तव प्रकट होते.

सारांश, ग्रामीण साहित्यात ग्रामीण माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म प्रकट होतात. ग्रामीण साहित्य हे व्यक्ती केंद्रित असते. कृषिकेंद्रित संस्कृती या संस्कृतीने निर्माण केलेले लोकमानस, गावगाडा यातूनच ग्रामीण साहित्य आकारास येते. ग्रामसंस्कृतीतूनच 'ग्रामीण' साहित्याची संकल्पना उदयास आली आणि ती रूढही झाली.

ग्रामीण साहित्य हे ग्रामीण व्यवस्थेशी संबंधित असते. "कृषिकेंद्रित व्यवस्था निसर्गसन्मुख आणि आदिमातेशी संवाद साधू पाहणारी स्वतंत्र अशी व्यवस्था म्हणजे ग्रामीण व्यवस्था."[३५] हे नागनाथ कोत्तापल्लेचे मत उचित ठरते.

### ❖ ग्रामीण साहित्य विकास: -

ग्रामीण साहित्याचा उदय आणि विकास खऱ्या अर्थाने विसाव्या शतकात झाला. एकोणिसाव्या शतकात ग्रामीण साहित्याचा पाया रचला गेला आणि विसाव्या शतकात खरेखुरे ग्रामीण साहित्य उदयास आले. 'ग्रामीण साहित्य' ही संकल्पना १९२५ पासून रूढ झाली. तेव्हापासून ग्रामीण जीवनातील वास्तव चित्र मराठी साहित्यात दिसू लागले. ग्रामीण साहित्यात पहिला आविष्कार कवितामधून झाला. कवितांमधून ग्रामीण जीवन उमटू लागले पण, या कवितांवर इंग्रजी कवितांचा प्रभाव जाणवतो. इंग्रजीतील 'पॅस्टोरल पोएट्री' (Postoral poetry) वरून मराठीत जानपदगीते, गोप - गीते निर्माण झाली असली तरी ग्रामीण साहित्याला एक दिशा मिळाली हे निश्चित मानावे लागेल. भा. रा. तांबे, कवी गिरीश, ग. ल. ठोकळ यांनी विशेषत: ग्रामीण वातावरण, ग्रामीण भाषा वापरून कविता निर्माण केल्या आहेत हे विसरून चालणार नाही.

१९२० मध्ये टिळकयुगाचा अस्त झाला आणि गांधीयुगाचा प्रारंभ झाला. 'गांधीवाद' ग्रामीण साहित्याचा प्रेरणास्त्रोत ठरला. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, परिवर्तन घडले, सारा समाज ढवळून निघाला. या सर्व घटनांचा परिणाम साहित्यावरही तितकाच प्रखरतेने झाला. साहित्यातही नवे परिवर्तन झाले. गांधीजींच्या विचारांनी साऱ्या जीवनाला व्यापून टाकले होते. 'खेडयाकडे चला' हा मूलमंत्र गांधीजींनी जनतेला देऊन खऱ्या भारताचे दर्शन खेडयात घडविले. खेडयाचे महत्त्व नव्या जाणिवासह पटवून दिले. खेडयाचा उध्दार करून विषमता, अज्ञान, दारिद्रय यांना दूर करून भारताला प्रगत राष्ट्र बनवायचे गांधीजींचे स्वप्न होते. गांधीजींचे विचार अत्यंत प्रभावी होते त्यात शंकाच नव्हती. त्याच्या प्रगल्भशाली विचारांचा प्रभाव इतका जबरदस्त होता की, ग्रामीण साहित्याची नवी कवाडे उघडली गेली असे म्हणावयास हरकत नाही. १९२५ नंतर ग्रामीण साहित्यावर गांधीजींच्या विचाराचा प्रभाव अधिक जाणवतो.

१९२५ नंतरच्या ग्रामीण साहित्यात वेगळेपण जाणवत असले तरी मराठी साहित्यापेक्षा फारसे वेगळे वाटत नाही. या संदर्भात नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत विचारात घेऊया. त्यांच्या मते, "१९२५ नंतर अवतरणाऱ्या ग्रामीण साहित्यामागील प्रेरणांचे वेगळेपण दिसत असले तरी स्वरूप मात्र तत्कालीन एकूण

मराठी साहित्यापेक्षा फारसे वेगळे नाही. तत्कालीन मराठी साहित्य हे मोठया प्रमाणात 'स्वप्नरंजनपर' आणि 'अवास्तव कल्पनाविश्वात' रमणारे आहे. ग्रामीण साहित्य या पेक्षा फारसे वेगळे आहे असे म्हणता येणार नाही"[३६]

१९२३ मध्ये रविकिरण मंडळाचा उदय झाला. या मंडळातील अनेक कवींनी ग्रामीण जीवनाविषयक कविता निर्माण करून ग्रामीण जीवनाचे चित्र टिपले आहे. कवी गिरीश, कवी यशवंत, भा. रा. तांबे यांच्या काव्याने विशेष लक्ष वेधून घेतले. १९३१ मध्ये वि. स. सुखटणकर यांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा कथासंग्रह प्रसिध्द करून खेडयातील समाज दर्शन घडविले. १९३२ मध्ये ग. ल. ठोकळांनी 'मीठभाकर' हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रसिध्द करून ग्रामीण जीवन चित्रण केले आहे.

याच दरम्यान ग्रामीण साहित्यात एक नवा प्रवाह येऊन मिळाला. तो प्रवाह म्हणजे 'प्रादेशिक' ग्रामीण संज्ञेप्रमाणेच 'प्रादेशिक' ही संज्ञाही रूढ झाली. साधारणत: १९२७ - २८ पासून प्रादेशिक जीवनचित्रण साहित्यातून प्रकट होऊ लागले होते. वि. स. सुखटणकरांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' (१९३१) या कथासंग्रहातून गोमांतक प्रदेशाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. १९३0 साली मडगावच्या साहित्य संमेलनात 'प्रादेशिक' ही संज्ञा ऐकल्याचे कवी बा. भ. बोरकरांनी सांगितले आहे.

'प्रादेशिक' ही संज्ञा 'ग्रामीण' या संज्ञेपेक्षा व्यापक स्वरूपाची मानली जाते. या संदर्भात मधु कुलकर्णी लिहितात, "ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य यामध्ये काहींनी भेद मानलेला आढळतो पण, परिसर म्हणजेच प्रदेश हे मान्य असल्यास ग्रामीण व प्रादेशिक या संज्ञा समानधर्मीच आहेत हे मान्य होण्यास हरकत नाही. किंचितसा फरक मानायचाच झाला तर 'प्रादेशिक' ही संज्ञा 'ग्रामीण' संज्ञेपेक्षा जास्त व्यापक आहे असे फार तर म्हणता येईल."[३७]

आनंद यादवांनी प्रादेशिक वाङ्मय ग्रामीण वाङ्मयातच असते असे मत व्यक्त करून पुढे ते असेही म्हणतात, " ग्रामीण वाङ्मय असा शब्दप्रयोग मराठीत करीत असताना त्या वाङ्मयाकडून तेथील समूहाच्या ग्रामजीवनाची अपेक्षा नसते. तेथील एखाद्या व्यक्तीचे जीवनदर्शनही ग्रामीण वाङ्मयात चालते .... प्रादेशिक वाङ्मयात त्या प्रदेशातील ग्रामविभागाचे समूहदर्शन अभिप्रेत असते आणि ग्रामीण वाङ्मयात त्या त्या ग्रामविभागातील व्यक्तीनिष्ठ जीवन अभिप्रेत असते. तो त्या प्रदेशाचाच पर्यायाने एक भाग असतो."[३८]

प्रादेशिक वाङ्मय हे ग्रामविभागातील समूहजीवनदर्शन आणि ग्रामीण वाङ्मय

म्हणजे ग्रामविभागातील व्यक्तिनिष्ठ जीवनदर्शन असा भेद करून प्रादेशिक वाङ्मय हे त्या प्रदेशातील ग्रामजीवनाचेच चित्रण असते असा समन्वय साधून 'ग्रामीण वाङ्मय' या शब्दावर अधिक भर यादवांनी दिलेला आहे.

'प्रादेशिक' आणि 'ग्रामीण' या संज्ञात काही साम्य असले तरी त्या वेगवेगळया आहेत असे नागनाथ कोत्तापल्ले नमूद करतात पुढे ते असेही म्हणतात, "....प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, ग्रामसंस्कृतीला फारसे महत्त्व देत नाही तर महत्त्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही ते येते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा एक भाग म्हणूनच येते ग्रामसंस्कृतीपेक्षा त्या प्रदेशाचा टापू अधिक महत्त्वाचा असतो. त्या दृष्टीने प्रादेशिक साहित्यातून व्यक्तिकेंद्रितता दिसत नाही तर समूहकेंद्रितता हे या साहित्याचे वैशिष्टय असते."[३९]

थोडक्यात 'प्रादेशिक' आणि 'ग्रामीण' या दोन संज्ञामध्ये काही साम्य भेद दिसून येत असले तरी हे दोन्हीही प्रवाह एकमेकात गुंतलेले आहेत असेच म्हणणे अधिक योग्य ठरेल. ग्रामीण संज्ञेसोबतच प्रादेशिक संज्ञेची वाटचाल झाली आहे.

१९४१ पासून ग्रामीण साहित्याला विशेष बहर आला. र. वा. दिघ्यांनी 'पाणकळा' (१९३९) निर्माण करून प्रादेशिकतेची खाण शोधली. र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, विशेषत: श्री. म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' (१९४१) हा ग्रामीण कथासंग्रह प्रसिध्द करून ग्रामीण भागातील दलितांच्या उपेक्षित भटक्या जीवनाचे अंतरंग उलगडून दाखविले आहे.

१९४१ ते १९६0 च्या दरम्यान ग्रामीण साहित्याला नवी दिशा मिळाली. श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकार यांनी ग्रामीण जीवनाचा अनुभव आपल्या लेखणीतून समृध्दपणे आविष्कृत केला. याच काळात ग्रामीण साहित्यात नवे पर्व सुरू झाले. नव्या चाकोरीतील ग्रामीण लेखकांचा उदय झाला. व्यंकटेश माडगूळकरांचे साहित्य एक नवतेज घेऊन जन्माला आले. माडगूळकरांबरोबर शंकर पाटील, द. मा. मिरासदार अशा काही लेखकांनी ग्रामीण साहित्याला एक नवदिशा दिली.

काही ग्रामीण स्त्री लेखिका उदयास आल्या. बहिणाबाई चौधरी, प्रतिमा इंगोले या ग्रामीण स्त्री लेखिकांनी ग्रामीण साहित्य विस्तारात मोलाचा हातभार लावला आहे.

'ग्रामीण' या संज्ञेबरोबरच 'प्रोदशिक' या संज्ञेनेही चांगलाच जोम धरला

होता. श्री. ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरीतून प्रदेशाचे जिवंत चित्रण दिसून आले. व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी' (१९५५) या कादंबरीने 'प्रादेशिक' हा शब्द सार्थकी लावला असे म्हटले तरी वावगे ठरू नये.

१९६० नंतरच्या ग्रामीण साहित्याने फार मोठी झेप घेतली. या काळात ग्रामीण लेखकांची नवविचारांची नवी पिढी उदयास आली. आपल्या ग्रामीण जीवनानुभवाची शिदोरी घेऊन ग्रामीण साहित्याला नवजीवन दिले. उध्दव शेळके, रा. रं. बोराडे, आनंद यादव, ना. धो. महानोर, महादेव मोरे, सखा कलाल, बाबा पाटील, शंकरराव खरात, आनंद पाटील याशिवाय अन्य लेखकांनी विविध भागातील ग्रामीण वास्तवाचे जीवनचित्रण करून बदलत्या ग्रामीण वास्तवाला लक्षणीय पध्दतीने हाताळले आहे.

१९७५ नंतर ग्रामीण साहित्यास नवउभारी मिळाली. ग्रामीण साहित्याच्या चळवळीचा उदय होऊन या चळवळीतून ग्रामीण लेखकांचा एक वर्ग उदयास आला. राजन गवस, अरूण साधू, बाबा भांड, चंद्रकुमार नलगे, देवदत्त पाटील, मनोहर तल्हार, वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, योगिराज वाघमारे, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख या लेखकांनी ग्रामीण साहित्यात अमूल्य अशी भर घातली आहे. ग्रामीण साहित्यात या लेखकांनी आमूलाग्र बदल घडवून आणला.

लेखक जेथे जन्मला, जेथे वाढला, ज्या निसर्गाच्या सान्निध्यात मनसोक्तपणे जगला, तेथील परिसराच्या रंगगंधासह बऱ्या वाईट अनुभवासह तो बरेच काही शिकला या अनुभवातूनच त्यांच्या लेखणीने ग्रामीण साहित्याला आकार दिला.

१९८० च्या दरम्यान खेडयातील एकूणच समाजजीवन बदलले. ग्रामीण भागातील शिक्षित झालेला लेखक वर्ग स्वत:ला आलेले अनुभव आणि ग्रामीण भागाचे चित्रण ग्रामीण साहित्यात करू लागला.

एकविसाव्या शतकात ग्रामीण साहित्यविश्वात अग्रेसर म्हणून प्रा. सदानंद देशमुख या लेखकांचा उल्लेख करणे आवश्यक ठरते. ग्रामीण साहित्यातील नव्या दमाचे ग्रामीण लेखक प्रा. सदानंद देशमुख यांनी ग्रामीण साहित्यात मोलाची अशी भर घालून स्वत:चा असा एक वेगळा ठसा निर्माण केला आहे. २१ व्या शतकाच्या उंबरठयावरचे बदलते खेडे तेथील ग्रामीण जीवन आणि निसर्गाशी चालणारा जीवनसंघर्ष याचे चित्रण 'तहान' (१९९८) या कादंबरीत आले आहे. धगधगत्या ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करून ग्रामीण साहित्याला एका वेगळया उंचीवर घेऊन जाण्याचे कार्य केले आहे. या नव्या ग्रामीण लेखकाने ग्रामीण साहित्यातून

वर्तमानाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी कथा कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे भेदक चित्रण वाचकासमोर उभे केले आहे. त्यांनी ग्रामीण साहित्याला नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. प्रा. सदानंद देशमुख यांचे ग्रामीण साहित्यात दिलेले योगदान किती मोलाचे आहे याचा अभ्यास दुसऱ्या प्रकरणात सविस्तरपणे करून घ्यावयाचा आहे.

येथवर आपण ग्रामीण साहित्य, प्रेरणा, स्वरूप, 'ग्रामीण' संकल्पना, ग्रामीण साहित्याचा विकास यांचा अभ्यास केला आहे. यानंतर ग्रामीण साहित्याच्या समीक्षकांनी केलेल्या विविध व्याख्यांचा अभ्यास करणार आहोत.

**❖ ग्रामीण साहित्य व्याख्या: -**

'ग्रामीण साहित्य निर्मिती होऊन आज पंच्याहत्तर वर्षे होऊन गेली तरी ग्रामीण साहित्याची समीक्षा करणारे समीक्षक अगदी बोटावर मोजण्याइतकेच आहेत ही फार मोठी ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने दुर्दैवाची बाब आहे. मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याने महत्त्वाचे स्थान प्राप्त केले असले तरी ग्रामीण साहित्यसमीक्षा उपेक्षितच राहिली आहे. एखादा समीक्षक ग्रामीण साहित्याचे लेख किंवा एखादा ग्रंथ निर्माण करतो हा एखादा अपवाद सोडता कोणत्याही समीक्षकाने ग्रामीण साहित्याची फारशी दखल घेतल्याचे दिसत नाहीत.

१९६० नंतर ग्रामीण साहित्याने नवे रूप धारण केले. विविध भागातून ग्रामीण लेखकांचा उदय झाला. १९७५ नंतर ग्रामीण साहित्यात क्रांती घडून आली. ग्रामीण साहित्याने चळवळीचे स्वरूप धारण केले. ग्रामीण साहित्याची प्रथम दखल घेऊन न्याय देण्याचा प्रयत्न केला तो 'आनंद यादव' या ग्रामीण लेखकानेच. ग्रामीण साहित्याच्या अभ्यासाला यादवांचे ग्रंथ एक वरदानच ठरले असे म्हणावे लागेल.

आनंद यादवानंतर मराठी साहित्य समीक्षेत ग्रामीण साहित्यावर समीक्षा करणारे अनेक समीक्षक निर्माण झाले. नागनाथ कोत्तापल्ले, भालचंद्र नेमाडे, वासुदेव मुलाटे, द. ता. भोसले, गो. म. कुलकर्णी, चंद्रकुमार नलगे, रवींद्र ठाकूर हे समीक्षक ग्रामीण साहित्याला लाभले. ग्रामीण साहित्याचा सखोलपणे अभ्यास करून त्याच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला असला तरी देखील ग्रामीण साहित्याला कोणत्याही एका व्याख्येत बांधणे अशक्यप्राय आहे. यावरून ग्रामीण साहित्याचा प्रवाह किती विस्तारित स्वरूपाचा आहे याची कल्पना येते.

❖ **ग्रामीण साहित्याच्या संदर्भात समीक्षकांनी मांडलेल्या विविध व्याख्या: -**

**१. डॉ.आनंद यादव: -**

"खेडेगाव तेथील जीवनपध्दती, खास अशा रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्टयपूर्ण संबंध तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्टये, मानवी जीवनाला लाभलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक, मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न, समस्या इ. सर्व अनुभूतीतून निर्माण झालेले साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय."[४०]

**२. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले: -**

"ग्रामीण जीवनातून फुलणारे ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य."[४१]

**३. डॉ. गो. म. कुलकर्णी: -**

"आधुनिक काळाने ग्रामसंस्कृतीत जगलेला परंतु नवशिक्षणामुळे या संस्कृतीपासून कालांतराने अलग झालेला नव विचारवंतांचा, नवलेखकांचा जो वर्ग निर्माण झाला त्याला स्वत:चे वा इतराचे ग्रामीण जीवन जाणवते त्याचे दर्शन आजचा ग्रामीण लेखक प्राधान्याने घडवित असतो एकूणच आजचे वा कालचे ग्रामजीवन त्याचे मनोव्यापार, सांस्कृतिक संवेदन, सखोलपणे आणि सर्वांगीण स्वरूपात ज्यात व्यक्त होते असे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य."[४२]

**४. डॉ. भालचंद्र नेमाडे: -**

"ग्रामीण संस्कृतीची ओढ आणि त्यातील आनंदतत्त्वाबद्दलची आस्था ग्रामीण साहित्यातून प्रकट होते."[४३]

थोडक्यात ग्रामीण जीवनपध्दती, ग्रामीण माणसांचे मन आणि संस्कृतीचा ठेवा यांचा घेतला जाणारा शोध आणि बोध म्हणजे ग्रामीण साहित्य.

या सर्व व्याख्यांवरून असा निष्कर्ष काढता येईल की, 'ग्रामीणता' साकार होण्यामध्ये कृषिनिष्ठ संस्कृती, निसर्गसन्मुखता यातून निर्माण झालेले लोकमानस हे घटक महत्त्वाचे ठरतात. यातूनच जगण्याची एक 'रीत' साकार होत जाते या रीतीचे चित्रण ज्या साहित्यात आढळते ते ग्रामीण साहित्य.

❖ **ग्रामीण कादंबरी उदय: -**

एकोणिसावे शतक हे सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक या सर्व दृष्टीने

एक क्रांतीपर्व ठरले. मराठी साहित्यातही क्रांती घडून आली. 'कादंबरी' वाङ्मयाचा पाया रचला गेला. मनोरंजनवादी आणि अद्भूतरम्य कादंबऱ्या निर्माण झाल्या या सर्व कादंबऱ्या केवळ वाचकांचे मनोरंजन करणाऱ्या होत्या. 'यमुनापर्यटन' (१९५७) ही बाबा पद्मनजी यांनी कादंबरी निर्माण करून समाजातील वास्तव चित्रण रेखाटले. या शिवाय इंग्रजांच्या आधुनिक धोरणामुळे येथील समाज साऱ्या गोष्टींचा विचार करू लागला. बहुजन समाजातील दारिद्रय, अज्ञान, शेतकऱ्याची दुर्दशा याची जाणीव समाजाला होऊ लागली. यातूनच सामाजिक चळवळीना प्रारंभ झाला. आपल्या लेखणीतून समाजोन्नती घडविण्याचे प्रयत्न अनेकांनी केले.

महात्मा फुल्यांसारख्या थोर समाजसुधारकाने 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८३) हा ग्रंथ लिहून ग्रामीण जीवनचित्रणाचा पहिलावहिला स्पर्श मराठी साहित्याला घडविला. हा ग्रंथ म्हणजे शेतकऱ्यांच्या शोषणाचा महालेख ठरतो. या ग्रंथाने मराठी साहित्यात ग्रामीण कादंबरीची मुहूर्तमेढ रोवली असे म्हणावे लागेल. ग्रामीण कादंबरीच्या उदयापासून आजपर्यंतची ग्रामीण कादंबरी ही विविध बदलत्या प्रवाहातून विकसित पावली आहे असे म्हटले तरी वावगे ठरू नये.

### ❖ ग्रामीण कादंबरी मुहूर्तमेढ: -

महात्मा फुले या थोर समाजसुधारकाने शेतकऱ्याविषयीच्या तळमळीतून 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८३) हा ग्रंथ लिहून ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शन घडविले आहे. तत्कालीन काळात अद्भूतरम्य कादंबऱ्या निर्माण झाल्या होत्या त्या केवळ शृंगाराने भरलेल्या होत्या. याच वेळी 'यमुनापर्यटन' सारख्या सामाजिक कादंबरीला 'प्रचारकी थाटाची' कादंबरी म्हणून उपेक्षित ठेवले. 'यमुनापर्यटन' नंतर सुमारे २५ - २६ वर्षांनी 'शेतकऱ्याचा आसूड' हा वास्तववादी ग्रंथ निर्माण झाला. याचा अर्थ मधल्या काळात केवळ रंजनवादी लेखन झाले असा होतो.

महात्मा फुल्यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ शेतकऱ्याच्या दारिद्रयाचा दस्तऐवज ठरला गेला. तत्कालीन शेतकऱ्यांचे जीवन, इंग्रजी राजवट, कर्मठ ब्राह्मणांचे वर्चस्व या सर्व गोष्टी ग्रंथात सामावलेल्या आहेत. या ग्रंथाची भाषा पुस्तकी नाही अशी टीका करून समीक्षकांनी मात्र या ग्रंथाकडे कायम दुर्लक्ष केलेले आहे. पण ग्रामीण साहित्याचे जनक डॉ. आनंद यादव यांनी या ग्रंथाचे मोल ओळखून न्याय देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. आनंद यादव ग्रंथाच्या गद्यशैलीविषयी लिहितात, " 'शेतकऱ्याचा आसूड' मधील गद्यरचना तर निबंधापेक्षा सर्वार्थाने बखरीच्या प्रकृतीला जवळची वाटते. या पुस्तकात सत्याचे तत्कालीन पध्दतीने विवरण करीत - करीत ते सत्य पटवून देण्याच्या विदग्ध नैबंधिक पध्दतीपेक्षा

स्वत:च्या मनाला अगोदरच पटलेले व्यापक सत्य फक्त अनुकूल उदाहरण देऊन उपरोध उपहासाच्या वापराने रोचक करून प्रभावी शब्दचित्रे रेखाटून प्रसंगी भावनात्मक आवाहन करून पुन्हा - पुन्हा वेगवेगळया पध्दतीने आविष्कृत करून वाचकाच्या मनावर खोल - खोल बिंबवत जाणे, ही त्यांच्या गद्यलेखनाची प्रकृती बखरीला अतिशय जवळची आहे. या पध्दतीचा जनसामान्यांवर अधिक प्रभाव पडतो. ती जास्त आवाहक वाटत असते."[४४]

तत्कालीन शेतकऱ्यांचे दु:ख, दारिद्रय वा त्याचे जटिल प्रश्न प्रतिबिंबीत होणे अशक्यच होते. अशा काळात महात्मा फुल्यांनी ते धाडस केलेले दिसते. शेतकऱ्याचा आसूडविषयी स. गं. मालशे लिहितात, "शेतकऱ्याच्या दुस्थितीचे विदारक चित्र रेखाटून त्यांचा प्रश्न पोटतिडिकीने धसास लावू पाहणारे हे पुस्तक आहे."[४५] असे नमूद करून पुढे ते लिहितात, " 'शेतकऱ्याचा आसूड' चा नावीन्यपूर्ण भाग म्हणजे शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीचे वास्तव चित्र, त्या अवनत स्थितीची केलेली मूलग्राही चर्चा आणि ती स्थिती सुधारण्यास्तव सुचविलेली उपाययोजना हा होय. शेतकऱ्यांच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्यांच्या हीनदीन गृहस्थितीचे जे वेधक वर्णन केले आहे ते एखाद्या ग्रामीण वास्तववादी कादंबरीला लाजवील इतके प्रत्ययकारी आहे."[४६]

ग्रामीण कादंबरीच्या पाऊलखुणा महात्मा फुल्यांच्या ग्रंथात दिसून येतात. वास्तववादी चित्रण करणाऱ्या फुल्यांना आनंद यादवांनी 'आधुनिक देशी मराठी साहित्याचे आद्य जनक' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला आहे. फुल्यांनी गावरान शैलीतील मराठी वाङ्मयाची मुहूर्तमेढ रोवली हे निश्चितच. खऱ्या - खुऱ्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करून ग्रामीण साहित्याची खरी ओळख पटवून दिली. शेतकऱ्याचा आसूड याविषयी नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "ग्रामीण जीवन चित्रणाचा पहिला स्पर्श मराठी साहित्याला फुल्यांनी घडविला."[४७]

थोडक्यात महात्मा फुल्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' ने ग्रामीण कादंबरीची मुहूर्तमेढ रोवली हे निश्चितच मान्य करावे लागेल.

### ❖ ग्रामीण कादंबरीचे पहिले पर्व (१८७४ - १९२०): -

महात्मा फुल्यांच्या क्रांतीकारी विचाराने सत्यशोधक चळवळीला प्रेरणा मिळाली. कृष्णराव भालेकर महात्मा फुल्यांच्या विचारांनी प्रभावित झाले होते. 'दीनबंधू' हे बहुजन समाजासाठी नियतकालिक सुरू करून त्यातून शेतकऱ्याचे तसेच बहुजनसमाजाचे प्रश्न मांडले. 'बळीबा पाटील' (१८८८) ही कादंबरी प्रकाशित करून

खेडयातील जीवनाचे अतिशय वास्तवदर्शी आणि प्रभावी दर्शन घडविले आहे. श्री. रायकरांच्या मते ही कादंबरी १८८८ मध्ये जरी प्रसिध्द झाली असली तरी १८७७ मध्येच या कादंबरीचे लेखन पूर्ण झाले होते. ही कादंबरी चार भागात लिहिलेली आहे.

महाराष्ट्रात १९७७ साली पडलेल्या दुष्काळावर आधारित ही कादंबरी आहे. शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या नोकरदार वर्गात त्याकाळी ब्राह्मणाचे वर्चस्व असल्याचे व त्यांच्या स्वार्थी क्षुद्रवृतीचे परखड चित्रण केलेले आहे. गावचा पाटील सर्व धर्मातील लोकांची सभा घेतो व समाजातील अनेक प्रश्नांवर चर्चा होते या चर्चेतून कृष्णरावांनी अनेक प्रश्न हाताळले आहेत.

ग्रामीण माणसाचे कष्टाळू जीवन उपासमारी भांडणतंटा कुलकर्ण्याकडून होणारी गावकऱ्यांची फसवणूक याशिवाय ग्रामीण भागातील अपप्रवृत्तीचाही उल्लेख केलेला आहे. सीताराम रायकर या कादंबरीला रूपकथा मानून ते पुढे असेही लिहितात "बाळासाहेब, रावसाहेब, दौलतराव, मैनाबाई हे भालेकरांच्या विचारांचे प्रतिनिधित्त्व करतात.... भालेकरांनी आपल्या शेतकऱ्यांच्या स्थितीविषयीचे, त्यांची दु:खे दूर करण्यासाठी काय केले पाहिजे याविषयी विचार मांडण्यासाठी पात्रे, संवाद, प्रसंग व ग्रामीण पार्श्वभूमी वापरून प्रचारकी हेतू प्रधान मानून लिहिलेली ही कादंबरी आहे."[४८]

महात्मा फुल्यांच्या विचारांचा प्रभाव संपूर्ण कादंबरीवर जाणवतो. फुल्यांनी जी विचारसरणी समाजात रूढ केली तीच विचारसरणी रूढ करण्याचा प्रयत्न भालेकरांनी केला. 'बळीबा पाटील' ही कादंबरी आहे असे नि:संदिग्धपणे म्हणता येईल की नाही अशी शंका व्यक्त करून नागनाथ कोत्तापल्ले पुढे लिहितात, "कृष्णराव भालेकरांच्या दृष्टीने ही कादंबरी लिहीणे महत्त्वाचे नसावे जो विषय त्यांना सांगावयाचा आहे तो त्यांनी कादंबरीरूपाने नीट सांगता येईल असे वाटल्यामुळे ते कादंबरी लेखनाकडे वळले असावेत."[४९]

'बळीबा पाटील' या कादंबरीतून भालेकरांनी बहुजन समाजाच्या जागृतीसाठी प्रयत्न केलेला दिसून येतो. या कादंबरीच्या संदर्भात ल. रा. नसिराबादकर लिहितात, "पांढरपेशा आणि उच्चवर्णियांच्या परंपरापेक्षा अधिक वास्तव सखोल आणि मुळासकट जीवन घेऊन येणारी भूमिनिष्ठ कलात्मकतेचा मुलाहिजा न बाळगता बहुजनांचे जीवनदर्शन उघडेवाघडेपणाने पण रसरसून घडविणाऱ्या जागृतीसाठी तळमळणाऱ्या बहुजनसमाजामधील साहित्यकारांची एक स्वतंत्र व समांतर अशी परंपरा मराठीत निर्माण झाली व वाढली पण तिची फारशी दखल मराठी वाङ्मयेतिहासकारांनी घेतलेली नाही."[५०]

आनंद यादव 'बळीबा पाटील' या कादंबरीला पहिली ग्रामीण कादंबरी मानत नाहीत 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीला पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून निर्देशिली आहे.

थोडक्यात 'बळीबा पाटील' या कादंबरीला पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून नाकारले असले तरी ग्रामीण कादंबरीचा पाया मात्र याच कादंबरीने रचला हे अमान्य करता येणार नाही.

या कालखंडातील आणखी एका महत्वाच्या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. विसाव्या शतकाच्या प्रारंभी 'धनुर्धारी' (रा. वि. टिकेकर) यांनी 'पिराजी पाटील' (१९०३) ही ग्रामीण जीवनाविषयक कादंबरी लिहून नवी वाट चोखाळली आहे. कादंबरी एकूण तेरा प्रकरणात विभागलेली असून पृष्ठांची संख्या १३० इतकी आहे. धनुर्धारीनी भीषण दुष्काळ या दुष्काळामुळे शेतकऱ्याची झालेली उपासमार पांढरपेशी वर्गाची मक्तेदारी बेजबाबदार शासनाबद्दलची चीड 'पिराजी पाटील' या कादंबरीतून व्यक्त केलेली दिसून येते. शेतकऱ्यांना दुष्काळात पांढरपेशांनी कसे लाथाडले, लुटालूट, लाचखोरी या साऱ्यांचे चित्रण कादंबरीत आले आहे. धनुर्धारींना ग्रामव्यवस्थेचे नेमके आकलन असल्याने संपूर्ण ग्रामजीवन अतिशय सूक्ष्मतेने प्रकट केले आहे.

कादंबरीची भाषा अगदी रोखठोक तशीच साधी, सोपी आहे. म्हणूनच ही कादंबरी महत्वाची मानली जाते अर्थातच या कादंबरीतही काही दोष आहेत पण हे काही दोष सोडले तर 'पिराजी पाटील' ही एक यशस्वी ग्रामीण कादंबरी म्हणावयास हरकत नाही.

कुसुमावती देशपांडे यांनी कादंबरीचे अचूक मूल्य ओळखून 'पिराजी पाटील' विषयी लिहितात, " 'पिराजी पाटील' ही ग्रामजीवनविषयक कादंबरी अधिक मौलिक व वस्तुनिष्ठ आहे."[५१] असे नमूद करून पुढे त्या लिहितात "महाराष्ट्रातील ग्रामजीवन अव्वल इंग्रजांच्या काळातील अधिकाऱ्यांची बेपर्वाही नवीन राज्यव्यवस्थेच्या पध्दती निसर्गाची अवकृपा इत्यादी मानवी व अतिमानवी कारणांमुळे कसे विस्कळीत झाले व त्यावर अखेर दुष्काळामुळे केवढी अवकळा पसरली याचे धनुर्धारीनी फार जाणतेपणाने वर्णन केले आहे."[५२]

'पिराजी पाटील' या कादंबरीविषयी समीक्षकांनी विविध मते नोंदविली आहेत ती अशी,

आनंद यादव-

"पांढरपेशा ब्राह्मणी जीवनाच्या कक्षेबाहेर जाऊन मराठी वास्तव जीवन पाहणारा या काळातला एकच एक कादंबरीकार म्हणून धनुर्धारीचे महत्व विशेष वाटते."[५३]

रवींद्र ठाकूर-

" 'पिराजी पाटील' ही ग्रामीण वास्तवाचा तलस्पर्शी वेध घेणारी वाचकाला विचार प्रवृत्त करणारी कादंबरी आहे."[५४]

नागनाथ कोत्तापल्ले-

"ग्रामीण जीवनाचे वास्तव सूक्ष्मतेने प्रकट करू पाहणारी ही यशस्वी कादंबरी आहे असे म्हणता येईल."[५५]

थोडक्यात एक यशस्वी ग्रामीण कादंबरी म्हणून 'पिराजी पाटील' या कादंबरीकडे पाहता येईल. या कालखंडाचे वैशिष्टय असे सांगता येईल की 'बळीबा पाटील' आणि 'पिराजी पाटील' या दोनच कादंबऱ्यांनी हा कालखंड ओळखला जातो. या दोन्ही कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीची बीजे रोवली असे म्हणावयास हरकत नाही.

### ❖ ग्रामीण कादंबरीचे दुसरे पर्व (१९२० - १९६०): -

या कालखंडात ग्रामीण कादंबरीचे दोन टप्पे पडलेले दिसून येतात. स्वातंत्रपूर्व कालखंड आणि स्वातंञ्योत्तर कालखंड या दोन टप्प्यात ग्रामीण कादंबरीचा विकास होत गेला. या कालखंडात ग्रामीण कादंबरीने एक पायंडा घातलेला दिसून येतो. नवी दिशा नवे भान राखून कादंबरी निर्माण झाली आहे.

### ❖ स्वातंत्रपूर्व कालखंड (१९२० - १९४५): -

विसाव्या शतकाच्या प्रारंभी धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' (१९०३) ही कादंबरी प्रकाशित झाल्यानंतर तब्बल वीस वर्षे ग्रामीण कादंबरी निर्मितीमध्ये खंड पडलेला दिसून येतो. १९२० नंतर मात्र ग्रामीण जीवनानुभव प्रकट करणारे साहित्य निर्माण होऊ लागले. टिळकयुगाचा अस्त होऊन गांधीपर्वाचा प्रारंभ झाला. गांधीजींच्या विचाराने समाजात नवक्रांती घडून परिवर्तनाला दिशा मिळाली. 'खेडयाकडे चला' या गांधीजींच्या संदेशामुळे सारा समाज भारावून गेला. याचा परिणाम साहित्यावरही झाला. शेतकरी मजूर कोळी आदिवासी आदिंचे चित्र साहित्यातून उमटू लागले. ग्रामीण जीवनासंबंधीचे एक नवे भान मराठी लेखनाला आले. नवनवीन विचारांचे लेखक निर्माण झाले.

१९२० नंतरचे पहिले ग्रामीण जीवन चित्रण करणारे कादंबरीकार म्हणून ना. वि. कुलकर्णी यांचा उल्लेख करावा लागेल. कुलकर्ण्यांनी ग्रामीण जीवनानुभवाच्या वेगवेगळया वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला आहे. 'मजूर' या त्याच्या पहिल्या कादंबरीतून शेतकऱ्याच्या जीवनाची झालेली परवड चित्रित केली आहे. दुष्काळ, शेतसारा, कर्ज, शोषण इत्यादी अनेक कारणांमुळे शेतकऱ्याची कशी वाताहत होते याचे वास्तवदर्शी चित्रण या कादंबरीत आलेले आहे. याशिवाय 'दिवस कसे जातील' (१९२५), 'शिपाई' (१९२५), 'पैसा' (१९२६), 'माणिक' (१९३१) या कादंबऱ्यांतून ग्रामीण सृष्टी आणि ग्रामीण जीवनानुभव याचे चित्रण केलेले आहे. म्हणूनच त्यांना 'खेडूत सृष्टीचे कादंबरीकार' असे संबोधले जाते. असे असले तरी कुलकर्ण्यांच्या कादंबऱ्यांची योग्य ती दखल घेतली गेली नाही असे म्हणावे लागेल. मात्र वि. स. खांडेकरांनी कुलकर्ण्यांच्या कादंबरीचे योग्य मोल ओळखून ते कादंबरीविषयी लिहितात, "जे धाडस कोल्हटकर, गडकरी, वा. म. जोशी, फडके यांनी केले नाही ते ना. वि. कुलकर्णी यांनी करून 'नवी दिशा' दाखविण्याचा प्रयत्न केला आहे."[५६]

१९२० नंतर साहित्यात अनेक वाद निर्माण झाले. गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद, मानवतावाद या साऱ्या वादांचा प्रभाव ग्रामीण कादंबरीवरही पडलेला दिसून येतो.

वि. वा. हडप (अन्नदाता उपाशी - १९३१), मामा वरेरकर (फाटकी वाकळ १९४१), वि. स. खांडेकर (कांचनमृग १९३१), (उल्का १९३४), (दोन धृव १९३५) या साऱ्या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे चित्रण रेखाटलेले आहे. या कादंबऱ्यांवर मार्क्सवाद, गांधीवादाचा प्रभाव दिसून येतो. या शिवाय खेडयातील समस्या आणि ग्रामवाद यांच्याजवळ या कादंबऱ्या गेल्याच नाहीत त्या वरकरणी स्वरूपाच्या वाटतात. 'रामतनय' यांनीही ग्रामीण कादंबऱ्या लिहून ग्रामीण कादंबरी विकासात भर घातली आहे.

१९४० पर्यंतची कादंबरी ही गांधीवाद, मार्क्सवाद यांच्या प्रभावातून निर्माण झालेली दिसून येते. ग्रामीण कादंबरी लेखनास महात्मा फुल्यांची विचारधारा सहाय्यक ठरली कृष्णराव भालेकर, धनुर्धारी, ना. वि. कुलकर्णी यांच्या लेखणीतून ग्रामीण कादंबरीचा उदय झाला. वास्तववादी कादंबरीचा हा एक नवा आविष्कार होता. या आविष्कारातून अस्सल ग्रामीण जीवनचित्रण करणारे लेखक उदयास आले असे म्हणणे युक्त ठरेल.

ग्रामीण कादंबरीला मातीचा गंध प्राप्त करून दिला तो र. वा. दिघ्यांच्या

'पाणकळा' (१९३९) या कादंबरीने . ग्रामीण जीवनाच्या अधिक जवळ जाऊन ग्रामीण जीवनवास्तवाचे चित्रण केलेले आहे . शेतकऱ्याचे निसर्गावर अवलंबून असणारे दरिद्री जीवन, सावकारी पाश, दुष्काळामुळे होणारी जीवनाची होरपळ, वैमनस्य, संघर्ष या सर्व गोष्टी पाणकळातून साकार होतात. 'पाणकळा' विषयी स. गं. मालशे लिहितात, " 'पाणकळा' ही ग्रामीणतेचे कातडे पांघरलेले एक पाश्चात्य धर्तीची प्रणयरहस्य कथा आहे ."[५७]

'सराई' (१९४३) ही दिघ्यांची अतिशय लोकप्रिय ठरलेली कादंबरी होय. ग्रामीण वास्तवाबरोबरच कल्पनारम्यतेचे मिश्रण करून लिहिलेली ही कादंबरी सुधारणावादाकडे झुकलेली दिसते. याशिवाय 'आई आहे शेतात' (१९५६), 'पड रे पाण्या' (१९५८) या कादंबऱ्यांतूनही ग्रामीण जीवन चित्रित केले आहे .

दिघ्यांनी अद्‌भूतरम्यतेबरोबरच गांधीवादाचा पुरस्कार केलेला दिसून येतो . दिघ्यांच्या कादंबरीने एका नव्या प्रवाहाचा शोध लावला तो म्हणजे प्रादेशिकतेचा. खरे तर कादंबरी ही कोणत्यातरी प्रदेशातच घडत असते म्हणून प्रत्येक कादंबरी प्रादेशिक असते.. दिघ्यांनी कोकण प्रदेशावर अधिक भर दिला आहे. दिघ्यांच्या कादंबरीचे वर्णन ल. ग. जोग 'एका नव्या सोन्याच्या खाणीचा शोध' लागला अशा शब्दात करतात. आज दिघ्यांना 'प्रादेशिक कादंबऱ्यांचे जनक' ही दिलेली उपाधी सार्थ ठरते .

फडके - खांडेकर यांच्या लोकप्रियतेच्या काळात र. वा. दिघ्यांनी 'पाणकळा' लिहून कादंबरीची कोंडी फोडून ग्रामीण अनुभवविश्वाचा परिचय करून दिला.

र. वा. दिघे समकालीन लेखक ग. ल. ठोकळ यांनीही ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली आहे. ग. ल. ठोकळ यांनी 'गावगुंड' (१९४६) ही कादंबरी लिहून ग्रामीण साहित्याला एक वेगळी ओळख करून दिली.

१९४१ पासून ग्रामीण साहित्याला विशेष अशी भरती आली. 'प्रादेशिक' हा नवा प्रवाह निर्माण झाला होता. दिघे - ठोकळ यांनी ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर कादंबरी लेखन केले. त्याचबरोबर आणखी काही कादंबरीकारांनी ग्रामीण कादंबऱ्या निर्माण करून ग्रामीण कादंबरीला विशेष असे स्थान प्राप्त करून दिले आहे .

बी. रघुनाथ, वि. द. चिंदरकर, बा. सी. मर्ढेकर, ना. के. महाजन, म. भा. भोसले, ग. त्र्यं. माडखोलकर, वि. ल. बर्वे, न. चिं. केळकर, वि. वि. बोकील, द. र. कवठेकर, रघुवीर सामंत, भा. द. खेर इत्यादी कादंबरीकारांनी

ग्रामीण कादंबरी विश्वात मोलाची भर घातलेली आहे.

या सर्व कादंबरीकारांच्यावर ग्रामवादाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. स्वातंत्र्यपूर्व कालखंड हा ना. वि. कुलकर्णी, र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, बा. सी. मर्ढेकर या कादंबरीकारांनी ग्रामीण कादंबरीचा बहारीचा काळ म्हणून गाजविला. ग्रामीण कादंबरीला लोकप्रियता आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्वाचे कार्य केले. या काळात प्रादेशिकतेचे नवे परिमाण ग्रामीण कादंबरीला येऊन मिळाले आणि ग्रामीण कादंबरीने साहित्यविश्वात उंच भरारी घेतली.

### ❖ स्वातंत्र्योत्तर कालखंड (१९२० - १९४५): -

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण कादंबरीने नवे भान, संवेदना, जाणिवा व्यक्त केल्या आहेत. या काळात ग्रामीण कादंबरीची जडणघडण होऊन काही बाबतीत ती स्थिरावली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कादंबरीवर दिघे, ठोकळ, मर्ढेकर यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. पण असे असले तरी युध्दोत्तर काळात अनेक स्थित्यंतरे घडली. नव्या जाणिवा निर्माण झाल्या. त्यांचे पडसाद साहित्यावर उमटायला फारसा उशीर लागला नाही. बा. सी. मर्ढेकर, शरदचंद्र मुक्तिबोध यांनी कवितेत नवा मानदंड घातला तर गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, शंकरराव खरात यांनी कथांमध्ये बदल घडवून आणला ही प्रक्रिया कादंबरी वाङ्मयात उशिरा सुरू झाली असेच म्हणावे लागेल. या काळात कादंबरीत परिवर्तन घडवून आणण्याचे श्रेय श्री. ना. पेंडसे यांना द्यावे लागेल. 'एल्गार' (१९४९) ही कादंबरी प्रकाशित करून ग्रामीण प्रदेश, निसर्ग जीवनानुभव याचे चित्रण केले आहे. फडके खांडेकरांच्या जोखडातून कादंबरीला मुक्त करून नव्या जाणिवांचे दर्शन घडविले आहे. 'गारंबीचा बापू' (१९५२) ही पेंडशांची अतिशय लोकप्रिय कादंबरी म्हणून उल्लेख करावा लागेल. श्री. ना. पेंडश्यांनी 'हद्दपार' (१९५०), 'हत्या' (१९५४), 'रथचक्र' (१९६२), 'तुंबडाचे खोत' (१९८७) 'या ग्रामीण कादंबऱ्या लिहून ग्रामीण कादंबरी वाङ्मयात मोलाचे योगदान दिले आहे. पण पेंडश्यांनी ग्रामीण प्रदेशाचे चित्रण कादंबरीत रेखाटले असले तरी त्यांच्या कादंबरीने ग्रामीण जीवनाला स्पर्श केल्यासारखे वाटत नाही. तरीही स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एक महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल.

श्री. ना. पेंडसे यांच्या समकालीन असणारे गो. नी. दांडेकर या कादंबरीकारानेही ग्रामीण कादंबरी क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केली आहे. दांडेकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून कोकणातील ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या 'शितू' (१९५३), 'पडघवली' (१९५५), 'पावनाकाठचा धोंडी'

(१९५५), 'पूर्णामायची लेकरं' (१९५८), 'माचीवरला बुधा' (१९५८), 'जैत रे जैत' (१९६५), 'मृण्मयी' (१९७०), 'रानभुली' (१९७८), 'वाघरू' (१९७९) या कादंबऱ्यांतून कोकणातील निसर्ग, विदर्भातील ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले आहे.

१९४५ ते १९५० या पाच वर्षात बहुतांशी सर्वच कादंबऱ्या प्रादेशिक म्हणून निर्माण झाल्या असल्याने निखळ असे ग्रामीण जीवन चित्रण करणारी एकही कादंबरी या काळात दिसली नाही.

श्री. ना. पेंडसे आणि गो. नी. दांडेकर यांच्या कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली आहेच पण आणखी एका कादंबरीकाराने कादंबरी वाङ्मयात वैशिष्टयपूर्ण अशी वेगळी भर घातली आहे. ते कादंबरीकार म्हणजे व्यंकटेश माडगूळकर हे होत.

एक बिनीचे कथाकार म्हणून व्यंकटेश माडगूळकरांचा उल्लेख केला जातो. पण त्यांनी कादंबरी क्षेत्रातही स्वत:चा असा एक वेगळा ठसा उमटविला आहे. ग्रामीण जीवनाचा अगदी सहजपणे आविष्कार त्यांच्या कादंबरीतून दिसतो. 'पुढचं पाऊल' (१९५०) ही त्यांची पहिली कादंबरी. या कादंबरीत एका दलित कलावंताची कथा वर्णन केली आहे. त्यांची 'बनगरवाडी' (१९५५) ही अत्यंत गाजलेली कादंबरी होय. एक प्रादेशिक ग्रामीण कादंबरी म्हणून 'बनगरवाडी' कडे पाहिले जाते. या कादंबरीतून अस्सल खराखुरा आणि जातिवंत अनुभव प्रत्ययास येतो. निसर्ग आणि मानवी जीवन यांचे एकात्मिकरण या कादंबरीत चित्रित केले आहे.

याशिवाय 'वावटळ' (१९६४), 'कोवळे दिवस' (१९७९), 'करूणाष्टक' (१९८२), 'सत्तांतर' (१९८२) इत्यादी कादंबऱ्यांतून व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण कादंबरीचे नवे दालन खुले केले असे म्हणणे युक्त ठरेल.

या काळात आणखी काही ग्रामीण लेखक निर्माण झाले. या लेखकांनी जे प्रत्यक्ष डोळयांनी पाहिलं, स्वत: अनुभवलं ज्या निसर्गाच्या सान्निध्यात तो जगला या साऱ्या अनुभवाचे अस्सल चित्रण कादंबऱ्यांतून चित्रित केले आहे. बा. भ. बोरकरांनी गोव्यातील ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर 'भावीण' (१९५०) ही कादंबरी लिहिली. विभावरी शिरूरकरांनी 'बळी' (१९५०) ही एका नव्या धर्तीवरची कादंबरी लिहून एक प्रकारची खळबळ माजवली.

एकंदरित या कालखंडाचा विचार करता 'प्रादेशिकतेचे' परिमाण अधिक घट्ट झाले आहे. श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर यांनी ग्रामीण कादंबरीला प्रादेशिकतेचा स्पर्श दिला. ग्रामीण कादंबरीने ग्रामीण जीवनाकडे नव्या

दृष्टिकोनातून पाहण्याची नवदृष्टी दिली. या काळात कादंबरीने वास्तवतेकडे अधिक भर दिला.या काळातील ग्रामीण कादंबरी वास्तवाकडे अधिक गांभीर्याने पाहू लागली हे निश्चित मानायला हवे.

१९२० - १९६० या चाळीस वर्षात ग्रामीण कादंबरीने नवनव्या वाटा चोखाळल्या. या काळात ग्रामीण कादंबरी बहरास आली. ग्रामीण जीवनातील अनुभव, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण माणसांची मने या साऱ्या गोष्टींचे घडविलेले दर्शन अवर्णनीय असेच आहे.

**❖ ग्रामीण कादंबरी तिसरे पर्व (१९६०....): -**

स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या नवविचारांच्या पहिल्या पिढीने ग्रामीण कादंबरीचा नवा मानदंड घालून दिला. व्यंकटेश माडगूळकर, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर या लेखकांनी ग्रामीण कादंबरी विकसित केली. १९६० नंतर नव्या दमाची दुसरी ग्रामीण पिढी ग्रामीण भागातून उदयास आली. अस्सल ग्रामीण जीवनानुभवातून ग्रामीण कादंबरी निर्माण झाली. विविध स्तरातून लेखकांनी आपले ग्रामीण जीवनातील प्रत्यक्ष अनुभवच कादंबरीत रेखाटल्यामुळे अधिक जिवंतपणा आलेला दिसून येतो.

साधारणत: १९६० नंतर निर्माण झालेली ग्रामीण कादंबरी अधिक जोमदारपणे उभी राहिली आहे. ग्रामीण वास्तवाचे भान आलेले त्याचबरोबर कलात्मक अभिव्यक्तींचे नवे आदर्शही निर्माण झाले.

व्यंकटेश माडगूळकरांनंतर महत्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणून उध्दव शेळके यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या 'धग' (१९६०) या पहिल्याच ग्रामीण कादंबरीने एक मैलाचा दगड गाठला. या कादंबरीचा महत्वाचा विशेष म्हणजे ग्रामीण वास्तवाचा आविष्कार घडवून रचनातंत्र झुगारून ग्रामीण वास्तव दर्शन अगदी समर्थपणे घडविले आहे. 'धग' ची नायिका 'कौतिक' हिच्याभोवतीच सारी कादंबरी गुंफली आहे. एका दरिद्री स्त्रिच्या मनाचे पदर ना पदर हळुवारपणे उलगडत जाणारी ही कादंबरी डोळयात भरते. एक जिद्दी स्त्री जगण्यासाठी शेवटपर्यंत झगडते परंतु शेवटी ती अयशस्वी होते. ही तिची शोकात्मिका आहे. 'धग' विषयी म. सु. पाटील लिहितात, "....धग ही कठोर वास्तवाचे कलात्मक रूप अविष्कृत करणारी पहिली ग्रामीण कादंबरी म्हणता येईल."[५८]

प्रा. गोविंद मुनेश्वर यांनी उध्दव शेळके यांची मुलाखत घेतली तेव्हा उध्दव शेळके म्हणाले, " 'धग' ही कादंबरी १९५६ साली लिहिली आणि १९६० साली प्रकाशित

झाली. ही कादंबरी प्रामुख्याने आत्मचरित्रपर कादंबरी आहे. यातली सर्व पात्रे आपल्या स्वभावानं जगण्याचा प्रयत्न करतात व तिथचं संघर्ष सुरू होतो. प्रसिध्द समीक्षक भालचंद्र फडके यांनी एके ठिकाणी लिहिलेलं आठवतं, 'रणांगण', 'बळी', 'धग' हे मराठी कादंबरीचे तीन टप्पे आहेत. 'धग' चा टप्पा अजून कुणी ओलांडू शकला नाही."[५९]

याशिवाय 'बाईविना बुवा' (१९६३), 'डाळिंबीचे दाणे' (१९७७) या कादंबरीतून ग्रामीण जीवन साकारले आहे. ग्रामीण कादंबरीत 'धग' च्या रूपाने फार मोठे योगदान उध्दव शेळके यांनी दिले आहे. अर्थात नंतरच्या त्यांच्या काही कादंबऱ्या लैगिंकतेकडे झुकलेल्या दिसतात. वैदर्भीय बोलीचा वापर हा विशेष मनाला भुरळ घालतो.

साठनंतर जो ग्रामीण लेखक वर्ग उदयास आला तो विविध स्तरातून आला असल्याने या लेखकांनी आपल्या ग्रामीण परिसरातील प्रत्यक्ष आलेले अनुभव कादंबरीबध्द केले आहेत. या ग्रामीण कादंबऱ्या प्रामुख्याने खेडेगावातील शेतीव्यवसाय, कष्टकरी, भटकेविमुक्त, आणि दलित यांच्या व्यथा, वेदना, संवेदना ग्रामीण कादंबरीत शब्दबध्द केल्या आहेत. म्हणूनच १९६0 नंतरची ग्रामीण कादंबरी अधिक यशस्वी झालेली दिसून येते.

रणजित देसाई यांनी 'बारी' (१९५९) मधून भटक्या विमुक्तांचे जनजीवन चित्रित करून त्याच्या व्यथा - वेदना मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

शंकर पाटील यांनी 'टारफुला' (१९६४) मधून ग्रामीण भागातील तीन पिढयांचा संघर्ष चित्रित केला आहे. याशिवाय आणखी काही ग्रामीण कादंबरीकारांनी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली आहे.

हमीद दलवाईनी 'इंधन' (१९६५) मधून परंपरावादी गाव आणि अप्रवृतीने ग्रासलेले गाव उभे केले आहे.

थोडक्यात साठनंतरच्या पहिल्या दशकातील कादंबरीकारांनी मराठी ग्रामीण कादंबरीला समृध्द केले आहे.

१९७0 नंतर मराठी ग्रामीण कादंबरी विश्वात अंतर्बाह्य बदल घडून आले. रा. रं. बोराडे आणि आनंद यादव यांच्या ग्रामीण कादंबऱ्यांनी एक लक्षणीय टप्पा गाठला आहे असे म्हटले तरी योग्य ठरेल.

रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' (१९७१) या कादंबरीने ग्रामीण कादंबरीला एक नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. मराठवाडयातील एका शिंपी


15911

कुटुंबाची झालेली शोकांतिका रेखाटली आहे. या कादंबरीविषयी शांता शेळके लिहितात, "तिचे सौंदर्य व सामर्थ्य तिच्या अकृत्रिम साधेपणात आणि कलात्मक सच्चेपणात आहे."[६०]

पाचोळाने काळाचे भान राखले आहेच पण जीवनानुभवाचा सच्चा आविष्कार घडविला आहे. पाचोळा विषयी र. बा. मंचरकर लिहितात, " 'पाचोळा' ची रचना बांधेसूद आणि एकात्म आहे. तिचा आशय अनेकांगी असला तरी बहुमुखी नाही. तिच्यातील अन्य आकृतीबंधांना स्वायत्तता नाही एकाच अनुभवसंघटनेतून ती घडविलेली आहे. ती बव्हंशी भावात्मक पातळीवर राहते. येथील घटनांच्या चित्रणात जी गतिमानता आहे ती जणू येथल्या सर्वहारा जीवनप्रवाहाचीच गती आहे."[६१]

बोराडयांनी आणखी काही कादंबऱ्या निर्माण करून ग्रामीण कादंबरीच्या विकासास हातभार लावला आहे. 'सावट' (१९८७) मधून उच्च शिक्षणामुळे निर्माण झालेले प्रश्न मांडलेले आहेत. 'चारापाणी' (१९७९) तून मराठवाडयातल्या दुष्काळी परिस्थितीचे चित्रण केले आहे.

रा. रं. बोराडेयांच्या समकालीन असलेल्या आनंद यादव यांनी 'गोतावळा' (१९७१) ही ग्रामीण कादंबरी निर्माण करून ग्रामीण कादंबरीला एक प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. 'गोतावळा' या कादंबरीत 'नारबा' हा ग्रामीण संस्कृतीचे एक रूप म्हणून त्याचा जीवनपट यादवांनी रेखाटला आहे. नवनवे प्रयोग करून ही कादंबरी अवतरली आहे. शेती विषयी असणारी श्रध्दा प्रेम आणि नवी दृष्टी यांच्या संघर्षात डळमळणारे ग्रामीण भावविश्व नारबाच्या रूपाने व्यक्त होते. र. बा. मंचरकर गोतावळा विषयी लिहितात, "कृषिसंस्कृतीच्या युगांताची कहाणी येथे बोलकी झाली आहे."[६२]

याशिवाय 'नटरंग' (१९८०), 'एकलकोंडा' अशा काही प्रयोगात्मक कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत. १९८० नंतरच्या दशकात 'झोंबी' (१९९०), 'नांगरणी', 'काचवेल', 'घरभिंती' (१९९२) या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांतून ग्रामीण कुटुंबाचा जीवनपट चित्रित करून ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे. १९८० नंतर यादवांचे लेखन बदलून गेले. नव्या जाणिवांचा प्रभावीपणे आविष्कार त्यांच्या कादंबऱ्यांतून प्रकट झाला. ग्रामीण जीवनातील ताणतणावाचे चित्रण यादवांनी चित्रित केले आहे.

आनंद यादव आणि रा. रं. बोराडे यांच्याबरोबरच साहित्यक्षेत्रात पदार्पण केलेल्या ना. धो. महानोरांनी 'गांधारी' (१९७३) तून स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण जीवनातील समस्या, ताणतणाव यांचे चित्रण केले आहे.

यादरम्यान आणखी काही लेखकांनी ग्रामीण कादंबऱ्या निर्माण केल्या परंतु 'ग्रामीण लेखक' ही उपाधी त्यांना लावली नाही. तरीही त्यांनी ग्रामीण कादंबऱ्या विकासास हातभार लावला आहे.

ग. दि. माडगूळकर 'आकाशाची फळे' (१९६०), महादेव मोरे 'पाव्हणा' (१९६६), 'एकोणिसावी जात' (१९६८), द. ता. भोसले 'मी आणि माझा बाप' (१९६९), चंद्रकुमार नलगे 'आगीनफुल' (१९७४) अशा अनेक ग्रामीण कादंबरीकारांनी ग्रामीण कादंबरीचे क्षितीज विस्तारण्यासाठी महत्वाचे असे योगदान दिले आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल, पहिल्या पिढीतील श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील यांची पिढी ग्रामीण जीवनचित्रणापासून दूर गेल्यासारखी वाटते. १९७० नंतर ग्रामीण भागात नवनवे प्रश्न निर्माण होऊन त्याचे तीव्र पडसाद समाजामध्ये उमटू लागले. ग्रामीणांच्या दु:खाला वाचा फोडणारी नवी पिढी शेतकरी कुटुंबातून उदयास आली. ग्रामीणांची दु:खे कादंबरीत शब्दांकित होऊ लागली. १९६० - १९७५ या काळातील ग्रामीण कादंबरी संमिश्र स्वरूपाची आहे.

### ❖ १९७५ नंतरची ग्रामीण कादंबरी: -

१९७५ नंतर मराठी साहित्यात एक सांस्कृतिक उद्रेक झाला तो म्हणजे ग्रामीण साहित्याची चळवळ उदयास आली. दलित साहित्यापाठोपाठच हा एक सांस्कृतिक उद्रेक होता. ग्रामीण भागातील समस्यांनी अधिक उग्र रूप धारण केले. ग्रामीण जीवनातील अनंत प्रश्न लोकांना भेडसावू लागले. ग्रामीण कादंबरी ग्रामीण जीवनाचा गांभीर्याने वेध घेऊ लागली. ग्रामीण जीवनातील ज्वलंत प्रश्न ग्रामीण कादंबरीच्या कक्षेत अवतरू लागले. ग्रामीण साहित्य चळवळीतून अनेक लेखक उदयास आले. या नवलेखकांना ग्रामीणतेचे आत्मभान जाणवले असल्याने या नवलेखकांनी ग्रामीण कादंबऱ्या लिहून ग्रामीण कादंबरीला नववैभव प्राप्त करून दिले. स्वातंत्र्योत्तर काळातील ही तिसरी नवी पिढी निर्माण झाली. आत्मभानातून निर्माण झालेल्या या कादंबरीने ग्रामीण वास्तव जीवनाचे भान आणून देण्याचे मोलाचे कार्य पार पाडले.

ग्रामीण कादंबरीचा हा प्रवाह पुढे वाहता ठेवण्यासाठी महत्वाचे कार्य अनेक कादंबरीकारांनी केले आहे. त्यामध्ये आनंद पाटील, पुरूषोत्तम बोरकर, अशोक व्हटकर, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, राजन गवस, विश्वास पाटील, रामचंद्र पाठारे, बंडु तुपे, ह. मो. मराठे, रवींद्र शोभणे, बाबा भांड, मोहन पाटील, आणि सदानंद देशमुख इत्यादीचा उल्लेख करता येईल.

आनंद पाटील 'कागूद आणि सावली' (१९८६), विश्वास पाटील 'झाडाझडती', पुरूषोत्तम बोरकर 'मेन इन इंडिया' (१९८७), अशोक व्हटकर 'बगाड' (१९८४), नागनाथ कोत्तापल्ले 'उलट चालिला प्रवाहो' (१९८५), वासुदेव मुलाटे 'विषवृक्षाच्या मुळया' (१९८९), राजन गवस 'चौंडकं' (१९८५), रामचंद्र पाठारे 'पाचर' (१९८९), बंडु तुपे 'झुलवा' (१९८६), ह. मो. मराठे 'देवाची घंटा' (१९८७), रवींद्र शोभणे 'प्रवाह' (१९८३), मोहन पाटील 'लिगाड आणि खांदेपालट' (१९९०) इत्यादी कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनातील ताण तणाव स्थित्यंतरे प्रकट केली आहेत.

याशिवाय आणखी काही कादंबरीकारांनी ग्रामीण जीवनाचे विविधांगी दर्शन घडविले. बाबा भांड 'जरंगा' (१९७८), नामदेव ढसाळ 'हाडकी हाडवळा', विजय सिरसाट 'काळगर्भ' , रंगनाथ पाठारे 'ताम्रपट', रंगराव पाटील 'दंश' (१९८७), व. बा. बोधे 'जंगल', सुरेश शिंगटे 'कालवा' इत्यादी कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनातील वास्तवाचे यथार्थपणे दर्शन घडविले आहे.

ग्रामीण कादंबरीला आकार देण्याचे मोलाचे कार्य वरील सर्व लेखकांनी केले. आजची ग्रामीण कादंबरी केवळ ग्रामीण जीवन चित्रण रेखाटत नाही तर जीवनात येणाऱ्या समस्या, दु:ख यामागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहे. असाच प्रयत्न आजचे उल्लेखनीय कामगिरी करणारे लेखक सदानंद देशमुख करत आहेत. एकविसाव्या शतकात एक सकस ग्रामीण लेखक म्हणून ग्रामीण साहित्याच्या आकाशात चमकायला लागले आहेत असे म्हटले तरी योग्यच ठरेल.

आधुनिक काळाचा रेटा, औद्योगिकरण, भांडवलशाही, मिश्र अर्थव्यवस्था या साऱ्यांमुळे ग्रामीण भागात असंख्य समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांना सामोरे जाऊन आजचा ग्रामीण लेखक वास्तवरूप मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या वास्तवाशी त्या समस्यांशी त्यांचे काहीतरी नाते असते, तळमळ असते त्यामुळे आजची कादंबरी ही सर्वस्पर्शी झाली आहे. बदलत्या ग्रामीण जीवनाचे वास्तव रूप टिपण्याचा प्रयत्न या काळातील अनेक कादंबरीकारांनी केला आहे असे म्हणावे लागेल. या काळात अनेक लेखक निर्माण झाले. यापैकीच महत्त्वाचे ग्रामीण लेखक सदानंद देशमुख यांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

सदानंद देशमुख यांनी आपले अनुभव प्रामाणिकपणे ग्रामीण कथा कादंबऱ्यांतून मांडले आहेत. त्यांनी ग्रामीण जीवनाविषयक निष्ठा जोपासून ग्रामीण जीवनातील वास्तवाचे चित्रण केलेले आहे. त्यांच्या साहित्याविषयीचा ऊहापोह पुढे आपण करणार आहोत. बदलते खेडे आणि तेथील जीवनपध्दती, ग्रामीण जीवनातील

भेडसावणारे प्रश्न, मनाची होणारी घुसमट, वेदना, त्याचबरोबर विद्रोह याचे चित्रण त्यांनी कथा - कादंबऱ्यातून साकार केले आहे. बदलत्या ग्रामीण जीवनाशी ते खंबीरपणे सामोरे गेले आहेत. त्यांनी पाहिलेले अनुभवलेले दु:ख, दारिद्र्य यांचा आलेखच कादंबरीतून रेखाटला आहे.

धगधगते ग्रामीण जीवन वाचकांसमोर उभे करण्याचे सामर्थ्य सदानंद देशमुख यांच्या लेखणीत दिसून येते. 'तहान' (१९९८), 'बारोमास' (२००२) या दोन ग्रामीण कादंबऱ्यांनी मराठी ग्रामीण कादंबरीला एका उंचीवर नेवून पोहचविले आहे. सदानंद देशमुख यांनी या दोन कादंबऱ्यांतून २१ व्या शतकातील ग्रामीण वास्तव वाचकासमोर साकार केले आहे. उल्लेखनीय कामगिरीसाठी 'नवग्रामीण साहित्याचा जीवनयात्री'[६३] असा गौरव लोकसत्ता या वृत्तपत्रात केला आहे. ग्रामीण साहित्यात आजही त्यांचे स्थान एक सच्चा ग्रामीण लेखक म्हणून तितकेच महत्वाचे मानले जात आहे. देशमुख यांच्या लेखणीत अजुनही ग्रामीण वास्तव साकार करण्याची तितकीच तेजस्वी धार असल्याचे दिसून येते.

थोडक्यात १९७५ नंतरची ग्रामीण कादंबरी एखाद्या फुलासारखी फुलून आली आणि या फुलांचा एक गुच्छ तयार झाला असे म्हटले तरी वावगे ठरू नये. या काळातील ग्रामीण कादंबरीने ग्रामीण परिसरात वाढलेल्या अपप्रवृत्ती, समाजव्यवस्था या साऱ्यांचा डोळसपणे विचार करून नेमक्या शब्दात वर्णन केल्यामुळे बदलत्या ग्रामीण जीवनाचे प्रत्यंतर घडविणारी कादंबरी म्हणून तिचे महत्त्व विशेष असे आहे. याशिवाय ग्रामीण कादंबरीने ग्रामीण वास्तवाशी एक जवळीकतेचे नाते निर्माण केले आहे असे म्हणावे लागेल.

आजच्या ग्रामीण साहित्य अभ्यासकांनी ग्रामीण कादंबरीचा सखोल अभ्यास करून तिचे वेगळेपण दाखविले आहे आणि एक नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. या संदर्भात रवींद्र ठाकूर लिहितात, "मराठी ग्रामीण कादंबरीने 'कादंबरी' या साहित्य प्रकाराच्या प्रकृतीचे भान अगदी सुरूवातीपासून बाळगण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्य ही एक सामाजिक घटना आहे. कादंबरी हा समकालीन समाजवास्तव चित्रित करणारा एक वाङ्मयीन दस्तऐवज आहे याचे भान ग्रामीण कादंबरीने दाखविले आहे."[६४]

वरील सर्व विवेचनावरून ग्रामीण कादंबरीची काही वैशिष्टये नोंदविता येतील.

१. ग्रामीण कादंबरीची मुहूर्तमेढ महात्मा फुल्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाने रोवली.

२. १८७४ ते १९२0 या कालखंडात 'बळीबा पाटील' (१८८८) आणि 'पिराजी पाटील' (१९0३) या दोनच ग्रामीण कादंबऱ्यां निर्माण झाल्या.

३. १९२0 ते १९४0 या कालखंडातील कादंबऱ्यांवर मार्क्सवाद, गांधीवादाचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

४. १९४0 नंतरच्या कादंबरीने प्रादेशिकतेचे रूप धारण केले.

५. र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ यांच्या कादंबरीने ग्रामीण जीवनानुभवाची नवी वाट चोखाळली.

६. र. वा. दिघ्यांच्या 'पाणकळा' ने मराठी माणसाला मातीचा गंध दिला.

७. १९४५ नंतरच्या ग्रामीण कादंबरीला श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर यांनी बहर आणला.

८. १९६0 नंतरची ग्रामीण कादंबरी अंतर्बाह्य बदलली.

९. प्रदेशानुसार भाषाशैलीची विविध रूपे ग्रामीण कादंबरीत अवतरू लागली. उदा. आनंद यादवांच्या कादंबरीत कोल्हापूर कागल मधली भाषा, उध्दव शेळके यांच्या कादंबरीत वैदर्भीय भाषा.

१0. १९७५ नंतरची ग्रामीण कादंबरी स्वतंत्र विचाराने निर्माण झालेली दिसते.

११. याशिवाय ही कादंबरी वर्तमानाचे भान व भविष्यकाळाचा वेध घेणारी अशी आहे.

१२. ग्रामीण जीवनातील आलेले अनुभव लेखकांनी ग्रामीण कादंबरीत मांडल्याने ती अधिक अंतर्मुख झाली आहे.

१३. १९७५ नंतरची ग्रामीण कादंबरी एका साच्यात अडकून पडल्यासारखी वाटते.

१४. एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर निर्माण झालेली 'तहान' या ग्रामीण कादंबरीने मात्र या साच्यातून बाहेर पडून समाजवास्तवाचे भान आणून दिले आहे.

१५. आजच्या ग्रामीण कादंबरीने ग्रामीण वास्तवाची व्यामिश्रता टिपण्याचा एक यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो. उदा. 'बारोमास' (सदानंद देशमुख)

सारांश, ग्रामीण कादंबरीच्या उदयापासून आजपर्यंतची ग्रामीण कादंबरी ही विविध टप्प्या - टप्प्यातून विकसित झाली आहे. बदलत्या काळाबरोबर बदलते खेडे तेथील जीवन या सर्वांचा अभ्यास करून अनेक ग्रामीण लेखकांनी ग्रामीण कादंबरीचे दालन समृध्द केले आहे. ग्रामीण कादंबरी संख्येने वाढली तशी गुणात्मकतेनेही वाढली. आजही तिच्यात नावीन्य जाणवते हे मात्र खरे.

# संदर्भ


१. श्री. नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली १९९०, पृ. १९५.

२. भागवत दुर्गा, केतकरी कादंबरी, मौज प्रकाशनगृह, मुंबई, आवृत्ती पहिली १९६७, पृ. ७.

३. तत्रैव.

४. मुखर्जी मीनाक्षी, तौलनिक साहित्याभ्यास आणि दिशा, (संपादक) जहागिरदार चंद्रशेखर, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती पहिली १९९२, पृ.२४२ .

५. श्री. नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, उनि. पृ. १९६.

६. तत्रैव.

७. श्री. ठाकूर रवींद्र, कादंबरीकार र. वा. दिघे, सुनिल अनिल मेहता, मेहता पब्लिकेशन हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०, पृ. २.

८. देशपांडे कुसुमावती, मराठी कादंबरी - पहिले शतक, मुंबई, मराठी साहित्य संघ, आवृती दुसरी १९७५, पृ. १५ – १६.

९. तत्रैव.

१०. (संपादक) जोग रा. श्री., मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड ५, भाग १ पुनर्मुद्रण १९९०, महाराष्ट्र साहित्यपरिषद, टिळकरस्ता, पुणे - ३०, पृ. ४१४.

११. देशपांडे कुसुमावती, उनि. पृ. १६.

१२. Bandopadhyay Manvendranath, Comparitive Indian Literature (Editor: C. M. George) Volume-1 Keral Sahitya Akedami Trichur, First Edition 1984, Page- 609.

१३. श्री. ठाकूर रवींद्र, मराठी ग्रामीण कादंबरी, प्रकाशक - सुनिल अनिल मेहता, मेहता पब्लिकेशन हाऊस, १२१६,सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती - नोव्हेंबर १९९३, पृ. ११.

१४. (प्रकाशक) कुलकर्णी अनिरूध्द अनंत,प्रदक्षिणा खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे - ४११०३०, पहिली आवृत्ती १९४१, पृ. २०२.

१५. तत्रैव.

१६. हस्तक उषा, साहित्य: अध्यापन आणि प्रकार, संपादक - श्री. पु. भागवत, मौज आणि पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९८७, पृ. २५३ - २५४.

१७. प्रा. गाडगीळ गंगाधर, साहित्याचे मानदंड, पॅाप्युलर प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली, पृ. क्र. २०७.

१८. Morgaon Charles Dailogue In Novels And Plays P-1.

१९. हस्तक उषा, मराठी कादंबरीतील संवाद, 'सत्यकथा', नोव्हेंबर १९६३, पृ. २६.

२०. Little William, The Shorter Oxford English Dictionary P- 1341.

२१. Baker Earnest A., History Of The English Novel: Vol I, P- 5.

२२. Lever Katherine, The Novel And The Reader P- 16.

२३. मोचनगड (गुंजीकर रा. भी.), व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती चौथी १९६५, पृ. १३५.

२४. प्रा. कुलकर्णी श्री. मा., कादंबरीची रचना, उन्मेष प्रकाशन, नागपूर, आवृत्ती पहिली १९५६, पृ. १५.

२५. प्रा. बापट प्र. वा. / गोडबोले ना. वा., 'मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास', पृ. ३७.

२६. जाधव रा. ग., मराठी विश्वकोश खंड - ३, (संपादक) जोशी लक्ष्मणशास्त्री, म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई, आवृत्ती पहिली, पृ. ६००.

२७. फडके ना. सी. मराठी कादंबरीची वाटचाल, परिसंवाद, पुणे.

२८. मालशे स. गं., साहित्यसिध्दांत 'थिअरी ऑफ लिटरेचर' चा अनुवाद साहित्यसंस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती १९८२, पृ. २३४.

२९. पेंडसे श्री. ना., एक मुक्त संवाद: उद्याच्या कादंबरीकाराशी मॅजिस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती - १९९३, पृ. ७.

३०. पठाण यु. म., मराठवाडयातील लोककथा, प्रस्तावना. पृ. ९ ते १७.

३१. श्री सावतामाळी सकलसंतगाथा, पृ. ९८.

३२. कोत्तापल्ले नागनाथ, ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि शोध, (प्रकाशक) - मेहता अनिलकुमार, मेहता पब्लिशिंग हाऊस, धनश्री अपार्टमेंटस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.

३३. शिंदे विठ्ठल रामजी, शिंदे लेखसंग्रह, (संपादक) मंगुडकर, पृ. १८४.

३४. अत्रे त्रि. ना., गावगाडा पृ. १ - २.

३५. डॉ. कोत्तापल्ले नागनाथ, उनि.

३६. तत्रैव, पृ. ३.

३७. कुलकर्णी मधु, महाराष्ट्र साहित्यपत्रिका, (ग्रामीण साहित्य विशेषांक), महाराष्ट्र साहित्यपरिषद, पुणे, जुलै - डिसेंबर १९८०, पृ. ४५.

३८. डॉ. यादव आनंद, ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली १९७९, पृ. ६२.

३९. कोत्तापल्ले नागनाथ, उनि. पृ. १५.

४०. डॉ. यादव आनंद, उनि. पृ. ६.

४१. कोत्तापल्ले नागनाथ, उनि. पृ. ७.

४२. डॉ. कुलकर्णी गो. म., ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही, (संपादक) मुलाटे वासुदेव, लेख - 'ग्रामीण साहित्य चळवळीच्या निमित्ताने', पृ. ३६.

४३. श्री. नेमाडे भालचंद्र, उनि.

४४. डॉ. यादव आनंद, मराठा साहित्य समाज आणि संस्कृती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली १९८५, पृ. १२६.

४५. मालशे स. गं., तारतम्य, परचुरे प्रकाशन मंदीर, मुंबई, आवृत्ती पहिली १९८७, पृ. ७.

४६. तत्रैव.

४७. कोत्तापल्ले नागनाथ, उनि. पृ. १०२.

४८. रायकर सीताराम, कृष्णराव भालेकर: समग्र वाङ्मय, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुणे, आवृत्ती पहिली, पृ. ५१.

४९. कोत्तापल्ले नागनाथ, उनि. पृ. ११२.

५०. नसिराबादकर ल. रा., द. म. साहित्यपत्रिका, जाने - फेब्रु - मार्च १९९१, पृ. ५ - ६.

५१. देशपांडे कुसुमावती, प्रकाशक - दि. वि. अमोणकर प्रमुख कार्यवाह, मंबई, मराठी साहित्य संघ डॉ. भालेराव मार्ग गिरगाव, मुंबई - ४, पहिली आवृत्ती १९५३, पृ. ३२४.

५२. तत्रैव.

५३. यादव आनंद, ग्रामीणता: साहित्य स्वरूप आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली १९८१, पृ. १२२.

५४. ठाकूर रवींद्र, मराठी ग्रामीण कादंबरी, उनि. पृ. २६.

५५. कोत्तापल्ले नागनाथ, उनि. पृ. ११७ - ११८.

५६. यादव आनंद, ग्रामीणता साहित्य स्वरूप आणि वास्तव, ( खांडेकर वि. स ) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली १९८१, पृ. ६८ वरून उध्दृत

५७. मालशे स. गं., आवडनिवड, सुपर्ण प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी १९७०, पृ. १५१.
५८. पाटील म. सु., प्रतिष्ठान, (कादंबरी समीक्षक विशेषांक), जाने. १९८१, पृ. ३५.
५९. दैनिक लोकमत अक्षररंग पुरवणीतील मुलाखत 'साहित्यातून घ्यावयाचा असतो निर्भेळ आनंद', रविवार, दिनांक - १५.०५.१९९२.
६०. शेळके शांता, ललित, जून, १९७२.
६१. (संपादक) नलगे चंद्रकुमार, ग्रामीण वाङ्‌मयाचा इतिहास, लेख - मंचरकर र. बा., पृ. ५४.
६२. मंचरकर र. बा., महाराष्ट्र साहित्यपत्रिका, पृ. ७७.
६३. लोकसत्ता, पुणे, शुक्रवार, २४ डिसेंबर २००४, पृ. ७.
६४. ठाकूर रवींद्र, उनि. पृ. ८.

***********